cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५६ | मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सरकार कोणकोणत्या 'संग्राम'ला रोखणार !

लंडनमध्ये राहणारे, मूळचे महाराष्ट्राचे प्रसिद्ध भूलतज्ज्ञ आणि सोशल मीडियावरून आपले विचार मांडणारे डॉ. संग्राम पाटील यांना शनिवारी मुंबई विमानतळावर पोलिसांनी ताब्यात घेतले. लंडनहून मुंबईत उतरताच पहाटे २ वाजता त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली.

# ...तर शेतकरी बनेल विजेचा उत्पादक!

## वर्षाला कमवू शकतो ८ लाख रुपये; पैसा कमावण्याचा उत्तम मार्ग

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांनी फक्त शेतीवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. बदलते हवामान, वाढता उत्पादनखर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांसमोर नवे आव्हान उभे आहे. अशा परिस्थितीत कृषी–व्होल्टेइक प्रणाली शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. या प्रणालीमुळे एकाच शेतातून दुहेरी लाभ घेता येतो. म्हणजे पिकांची लागवड सुरू ठेवत सौरऊर्जा निर्मिती करता येते आणि अतिरिक्त उत्पन्न मिळते.**

कृषी–व्होल्टेइक प्रणाली म्हणजे शेती आणि सौरऊर्जा निर्मिती यांचा एकत्रित वापर. यामध्ये शेतजमिनीत उंचीवर सौर



पॅनल्स बसवले जातात. पॅनल्सच्या खाली शेतकरी पिकांची लागवड करू शकतो. सौर पॅनल्समधून निर्माण होणारी वीज शेतकरी स्वतः वापरू शकतो किंवा वीज वितरण कंपन्यांना विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतो. यामुळे शेतकरी केवळ अन्नदाता नाही तर ऊर्जा उत्पादकही बनतो. प्रति हेक्टर सुमारे १०५ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प बसवल्यास, दररोज सरासरी ४२० किलोवॅट–तास वीज निर्मिती होते. ही वीज विकल्यास शेतकऱ्यांना दरवर्षी सुमारे ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते. यामुळे शेतीवरील आर्थिक अवलंबित्व कमी होते आणि उत्पन्नाचे स्थिर साधन उपलब्ध होते. सौर पॅनल्सवर पडणारे पावसाचे पाणी गोळा करून ते सिंचनासाठी किंवा पॅनल्स स्वच्छ करण्यासाठी वापरता येते. एका एकर क्षेत्रात पावसाळ्यात सुमारे दीड लाख लिटर पाणी साठवता येते. हे पाणी पुन्हा वापरल्यामुळे भूजलावरील ताण ▶▶ पान २ वर

### पर्यावरणावर सकारात्मक परिणाम

ॲग्रीव्होल्टेइक प्रणाली मुळे मातीची धूप कमी होते, धुळीचे प्रमाण घटते आणि जमिनीतील ओलावा टिकतो. परिणामी मातीची सुपीकता वाढते आणि दीर्घकाळ उत्पादनक्षमता सुधारते. ही प्रणाली शाश्वत शेतीकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे.

### शेतीत दुहेरी लाभ

एकाच शेतातून अन्न आणि ऊर्जा निर्मिती शक्य करून देणारी कृषी–व्होल्टेइक प्रणाली शेतकऱ्यांसाठी दुहेरी उत्पन्नाचे प्रभावी साधन बनत आहे. योग्य नियोजन आणि शासकीय सहकार्य मिळाल्यास हे तंत्रज्ञान ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देऊ शकते, असा विश्वास तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

# जिल्हा परिषदच्या निवडणुकांना कोर्टाकडून १५ दिवसांची मुदत वाढ

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, १५ फेब्रुवारीला होणार निवडणुका

दिल्ली । वृत्तसंस्था

**जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका १५ दिवसांनी पुढे ढकलण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयाला १५ दिवसांची मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार न्यायालयाने १५ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे. तसेच १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.**



राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आरक्षणासंदर्भातील स्थिती अद्याप स्पष्ट नसल्याने निवडणूक प्रक्रिया रखडल्याचे राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते. तसेच अर्ज सादर करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका घेण्यासाठी १० फेब्रुवारीची मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्याला न्यायालयाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला दिलासा मिळाला आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश दिले होते. परंतु विविध अडचणीमुळे ▶▶ पान २ वर

# समाजाच्या विरोधात गेले, त्यांना धडा शिकवा- मनोज जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

राज्यात सध्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार असतानाच, मनोज जरांगे पाटील यांनी या निवडणुकीत थेट उडी घेतली आहे. जे समाजाच्या आणि आरक्षणाच्या विरोधात गेले, त्यांना या निवडणुकीत धडा शिकवा, असे आवाहन त्यांनी मराठा बांधवांना केले आहे.



मराठा समाजाने आता निवडणुकीच्या राजकारणात कट्टर होणे गरजेचे आहे. ज्यांनी आरक्षण नाकारले, त्यांचे उमेदवार पाडण्यासाठी 'खुन्नस' ठेवा, असे जरांगे पाटील म्हणाले. या सरकारने मुस्लिम आणि दलित समाजाचीही दिशाभूल केली आहे. लोकसभेप्रमाणेच या निवडणुकीतही यांचा 'फेसा' काढायचा आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सत्ताधारी पक्षांकडे खूप पैसा असून ते नोटांची बंडलं वाटून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. आधी यांच्याकडे काय होते? आता मात्र शर्टाच्या खिशातून नोटांची बंडलं दिसताहेत, अशी बोचरी टीका त्यांनी केली. मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील सध्याच्या 'खिचडी' युतीवरही प्रहार केला. या निवडणुकीत कोणाची कोणासोबत युती आहे, हेच कळायला मार्ग नाही. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे सर्व स्वार्थासाठी एकत्र आले आहेत. मग यांचा शत्रू कोण? तर सामान्य गोरगरीब जनताच ना? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ▶▶ पान २ वर

## अकोल्यात भाजप–एमआयएम मागच्या दाराने पुन्हा एकत्र

अकोला । प्रतिनिधी

अकोल्यातील अकोटमध्ये गेल्याच आठवड्यात भाजपने एमआयएम पक्षासोबत युती केली होती. यावरून मोठा गदारोळ झाल्यानंतर युती तोडण्यात आली. तर तिकडे अंबरनाथमध्येही भाजपने काँग्रेससोबत युती केली होती. या दोन्ही ठिकाणी भाजपने संबंधित पदाधिकाऱ्यांना नोटीस बजावत कारवाई करणार असल्याचे सांगितले होते.

अकोटच्या नगरपालिकेत स्वीकृत सदस्य निवडण्याच्या प्रक्रियेत भाजप–एमआयएम युती वेगळ्या स्वरूपात पाहायला मिळाली. एमआयएमकडून स्वीकृत नगरसेवक पदासाठी एमआयएमकडून ताज राणा यांचे नाव समोर आले होते, तर भाजपकडून माजी नगराध्यक्ष रामचंद्र बरेठिया यांचा मुलगा जितेन बरेठिया यांनाही उमेदवारी दिली. ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींना हप्ता देण्यास न्यायालयाचा मज्जाव!

## सत्ताधारी सरकारला मोठा राजकीय धक्का

दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेच्या लाभ वितरणावर मोठे निर्बंध आले आहेत. सत्ताधारी महायुती सरकारने मकर संक्रांतीच्या (१४ जानेवारी) पूर्वी डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ या दोन्ही महिन्यांचा एकत्रित ३,००० रुपये (प्रति महिना १,५०० रुपये) लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची योजना आखली होती. मात्र, राज्य



निवडणूक आयोगाने जानेवारी महिन्याचा हप्ता अग्रिम स्वरूपात देण्यास स्पष्ट मज्जाव केला आहे. सरकारने मकर संक्रांतीच्या निमित्ताने लाडक्या बहिणींना ▶▶ पान २ वर

## अखेर परळी नगरपरिषदेतून एमआयएमची एक्झिट

बीड । प्रतिनिधी

**परळी नगरपरिषदेत स्थापन झालेली राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) आणि एमआयएम यांची युती अवघ्या काही दिवसांतच मोडीत निघाली आहे. एमआयएमला सोबत घेतल्याने शिंदे गटाने आक्रमक पवित्रा घेत थेट बाहेर पडण्याचा इशारा दिला होता. या दबावानंतर एमआयएमच्या नगरसेविकेने गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असून, तसे अधिकृत पत्र प्रशासनाला दिले आहे.**


परळी नगरपरिषदेत गटनेता निवडीच्या वेळी एमआयएमला सोबत घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. यावर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. ''एमआयएम सारख्या जातीवादी पक्षाला सोबत घेतल्याचे आम्हाला सांगण्यात आले नव्हते. हिंदुत्वाला आम्ही तडा जाऊ देणार नाही. एकतर शिवसेना सोबत राहील किंवा एमआयएम, दोघेही एका गटात राहू शकत ▶▶ पान २ वर

# एससी–एसटी आरक्षण

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्र आणि राज्यांना नोटीस!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) यांच्या आरक्षणात क्रीमी लेयर तत्त्व लागू करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांना नोटीस बजावली. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने, वकील अश्विनी कुमार उपाध्याय यांनी संविधानाच्या अनुच्छेद ▶▶ पान २ वर



# धनंजय मुंडे लवकरच मंत्रिमंडळात दिसतील

## राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे सुसंकेत!

मुंबई । प्रतिनिधी

**माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे त्यांच्यावर झालेल्या आरोपांच्या नंतर मागील एक वर्षापासून सरकारच्या बाहेर असून, लवकरच ते मंत्रिमंडळात पुनरागम करतील असे सूतोवाच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे.**

एका प्रसिद्ध राष्ट्रीय वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत प्रफुल्ल पटेल यांनी धनंजय मुंडे यांना सहन कराव्या लागलेल्या मनस्ताप व त्रासाबद्दल देखील वक्तव्य केले आहे. बीड जिल्ह्यात तत्कालीन निर्माण ▶▶ पान २ वर



# यापेक्षा मुर्खपणाचं दुसरं स्टेटमेंट असूच शकत नाही !

## देवेंद्र फडणवीस राज ठाकरेंवर भडकले

मुंबई । प्रतिनिधी

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची रविवारी (११ जानेवारी) मुंबईत शिवाजी पार्क मैदानात संयुक्त सभा पार पडली. या सभेत राज ठाकरे यांनी भाजपवर गंभीर आरोप केले. भाजपकडून केवळ अदानी उद्योग समूहाला विविध प्रकल्प देण्यात आल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला. तसेच आगामी काळात वाढवण बंदराजवळ विमानतळ बनवले जाईल, मुंबईचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ नवी मुंबईकडे वळवण्यात येईल आणि मुंबईचे सध्याचे विमानतळ अदानी उद्योग समूहाला विकत**



**दिले जाईल, असा आरोप राज ठाकरे यांनी केला. त्यांच्या या आरोपांवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंवर यावेळी अतिशय खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे.**

मला असे वाटते की, यापेक्षा मुर्खपणाचे दुसरे स्टेटमेंट असूच शकत नाही. मुंबईला दोन विमानतळांची गरज होती त्यामुळे दुसरे विमानतळ आम्हीच बांधले. या मुंबईचा विकास कुठल्या एका गोष्टीने थांबला असेल तर सिंगल स्ट्रिपचे एअरपोर्ट. मुंबईत इतके वर्ष ते होते, असे प्रत्युत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. मुंबईच्या विमनतळाचा प्लॅन १९९२ पासून झाला होता. पण कोणीच काम करु शकले नव्हते. तेव्हापासून ▶▶ पान २ वर

## चिमुकलीवर अत्याचार आरोपी तायडला जन्मठेप

तलवाडा । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील रामपुरी येथे दिं.४/५/२०२२ रोजी सहा वर्षीय चिमुकलीवर बलात्कार प्रकरणी बाल लेंगिक अत्याचार कायदा अंतर्गत पोस्को गुन्हा कलम ४५२.३३६.३६३.३७६. .दाखल करण्यात आला होता याप्रकरणी गेवराई तालुक्याचे पिकं पथक प्रमुख उपनिरीक्षक अर्चना भोसले मॅडम, सहाय्यक फौजदार भगवान खाडे, पोह. महेश झिखरे, कोर्ट लेडीज पोलीस कॉन्स्टेबल ज्योती साळुंखे मॅडम, चालक मैत्रै, या सर्व टीमने सगळा तपास करून या प्रकरणी सेशन कोर्ट बीड येथे केस चलविली गेली त्यानंतर साक्षी पुरावेच्या ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### नार्वेकरांच्या संपत्तीत १,८६८ टक्के वाढ

मुंबई : एखाद्या उमेदवाराच्या संपत्तीत किती वाढ व्हावी, याचा ठोकताळा कुणीही मांडू शकत नाही. मकरंद नार्वेकर यांचेही असेच आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे बंधू असलेले मकरंद नार्वेकर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उभे आहेत. मकरंद नार्वेकर आणि त्यांच्या पत्नी यांची मालमत्ता तब्बल १२४.४ कोटी रुपयांची असून ते मुंबईतील उमेदवारांमधील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. तत्पूर्वी यापूर्वी त्यांनी मालमत्ता किती होती, हे पाहिले तर त्यांच्या संपत्तीत झालेली वाढ डोळे विस्फारून टाकणारी आहे. मकरंद नार्वेकर सध्या कुलाब्यातील प्रभाग २२६ मधून निवडणूक लढवत आहेत. मकरंद नार्वेकर यांनी २०१२ मध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांच्याकडे ३.६७ कोटींची संपत्ती होती. २०१७ मध्ये ते निवडणुकीला पुन्हा उभे राहिले तेव्हा त्यांच्याकडील मालमत्तेचे मूल्य ६.३ कोटी रुपये होते. आता तिसऱ्यांच्या ते निवडणुकीच्या रिंगणात असून आता त्यांनी मालमत्ता १२४.४ कोटी रुपयांची आहे. निवडणूक आयोगाकडे त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून ही माहिती समोर आली आहे.

### अभिनेता विजयची सीबीआयकडून चौकशी

नवी दिल्लीः तामिळनाडूतील करूर येथे झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी तमिळगा वेत्री कळघम पक्षाध्यक्ष आणि दाक्षिणात्य अभिनेते विजय याची सोमवारी (दि. १२) केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सुमारे सहा तास कसून चौकशी केली. दिल्लीत कडेकोट बंदोबस्त विजय सोमवारी सकाळी १०:३० वाजता खासगी विमानाने दिल्लीत दाखल झाला. त्यानंतर तो थेट सीबीआय मुख्यालयात पोहोचला. यावेळी मुख्यालयाबाहेर समर्थकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता दिल्ली पोलीस आणि निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही चौकशी केली. विजय यांच्यासोबत पक्षाचे नेते आधव अर्जुन आणि निर्मल कुमार हेदेखील दिल्लीत उपस्थित होते. सीबीआय चौकशीदरम्यान विजयने स्पष्ट केले की, या दुर्दैवी घटनेला त्यांचा पक्ष किंवा पक्षाचे कोणतेही पदाधिकारी जबाबदार नाहीत. आपली उपस्थिती अधिक गोंधळ निर्माण करू शकते, असे वाटल्याने आपण कार्यक्रमस्थळावरून निघून गेलो होतो.

### माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड एम्समध्ये दाखल

नवी दिल्लीः माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना सोमवारी (दि.१२) दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) दाखल करण्यात आले आहे. शनिवारी त्यांना दोनवेळा भोवळ आली. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून डॉक्टर त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. १० जानेवारी रोजी धनखड हे स्वच्छतागृहात गेले असता त्यांना दोनदा भोवळ आली होती. सोमवारी ते नियमित तपासणीसाठी एम्समध्ये गेले असता, डॉक्टरांनी त्यांना अधिक चाचण्यांसाठी रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. त्यांची एमआरआय चाचणी केली जाणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. जगदीप धनखड यांना यापूर्वीही सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान असा त्रास जाणवला आहे.

### इंडियन आयडल फेम प्रशांत तामांगचे निधन

नवी दिल्लीः इंडियन आयडलच्या तिसऱ्या पर्वाचा विजेता गायक आणि अभिनेता प्रशांत तामांग याचे रविवार निधन झाले. वयाच्या ४३ व्या वर्षी त्याने अखेरचा श्वास घेतला. दिल्लीतील राहत्या घरी प्रशांतचा मृतदेह आढळून आला असून, या बातमीने मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे. प्रशांतचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, अद्याप अधिकृत वैद्यकीय अहवाल येणे बाकी आहे. रविवारी सकाळी प्रशांत तामांग त्याच्या नवी दिल्लीतील राहत्या घरी मृतावस्थेत आढळला. त्याला तात्काळ द्वारका येथील रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच घडलेल्या या घटनेमुळे त्याचे चाहते आणि कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. प्रशांत तामांग हा मूळचा कोलकाता पोलिस दलात कार्यरत होता. इंडियन आयडल ३ मध्ये सहभागी झाल्यानंतर आपल्या आवाजाच्या जोरावर त्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आणि विजेतेपद पटकावले. गायनासोबतच त्याने अनेक नेपाळी चित्रपटांमध्ये अभिनयही केला होता.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८७.०० क्विंटल | २,०८१ | ३,०२६ | २,५८६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३८.५० क्विंटल | २,३५१ | ३,८०० | ३,०४० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १४०.५० क्विंटल | ६,२०० | ७,९०० | ६,७२४ |
| उडीद :७.५० क्विंटल | ४,४०० | ६,००० | ५,२०० |
| बाजरी: ३७.०० क्विंटल | १,९०० | ३,५०० | २,८४१ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: १८५.५० क्विंटल | ४,६०० | ५,००१ | ४,८९३ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००१ | ६,५५० | ५,७७५ |

cmyk

अग्रलेख

# सरकार कोणकोणत्या 'संग्राम'ला रोखणार !

लंडनमध्ये राहणारे, मूळचे महाराष्ट्राचे प्रसिद्ध भूलतज्ज्ञ आणि सोशल मीडियावरून आपले विचार मांडणारे डॉ. संग्राम पाटील यांना शनिवारी मुंबई विमानतळावर पोलिसांनी ताब्यात घेतले. लंडनहून मुंबईत उतरताच पहाटे २ वाजता त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. भाजप नेत्यांविरुद्ध आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या आरोपाखाली ही चौकशी करण्यात आली असून १५ तासांच्या चौकशीनंतर पोलिसांनी नोटीस देऊन सोडले आहे. भाजपच्या सोशल मीडिया सेलचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक निखिल भामरे यांनी डॉ. संग्राम पाटील यांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. डॉ. पाटील यांनी फेसबुक आणि यूट्यूबच्या माध्यमातून भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला, तसेच समाजात द्वेष पसरेल असा मजकूर प्रसिद्ध केला असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीनुसार मुंबई पोलिसांनी डॉ. पाटील यांच्या विरोधात लुक आऊट (एलओसी) नोटीस जारी केली होती, ज्या आधारे त्यांना विमानतळावर रोखण्यात आले. डॉ. पाटील आपल्या पत्नीसह भारतात आले असता त्यांना मध्यरात्री ताब्यात घेऊन लोअर परळ येथील क्राईम ब्रँच कार्यालयात नेण्यात आले.

प्रसिद्ध वकील असीम सरोदे यांनी या कारवाईचा तीव्र निषेध केला. एका भारतीय वंशाच्या व्यक्तीला, जो लंडनमध्ये राहतो आणि सत्य मांडण्याचे काम करतो, त्याला अशा प्रकारे १५ तास अटकाव करून ठेवणे हा छळ आहे. डॉ. पाटील हे ब्रिटिश नागरिक असल्याने त्यांना हा त्रास दिला गेला आहे. डॉ. पाटील यांना आवश्यक ती सर्व कायदेशीर मदत दिली जाईल. केवळ ब्रिटनचे नागरिकत्व असल्याने पोलिस त्यांना अटक करू शकले नाहीत. सत्तेचे सत्य मांडणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी जो त्रास दिला व छळ केला त्याचा निषेध झाला पाहिजे. भारतातून जाताना पोलिसांना भेटून जावे असे बंधन त्यांच्यावर घालण्यात आलेले आहे. कोरोना काळात डॉ. संग्राम पाटील यांनी भारतीयांना सुरक्षित राहण्याचे, तसेच या रोगापासून बचाव करण्यासाठी उपयुक्त माहिती दिली होती. काय काळजी घेतली पाहिजे ते सांगितले होते आणि लोकांना धीर देण्याचे काम केले होते. सातत्याने सत्य, निर्भीड आणि स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. एक उत्तम भारतीय जे आता लंडनवासी आहेत त्यांच्यामध्ये डॉ. संग्राम पाटील यांचे नाव अग्रणी आहे. डॉ. संग्राम पाटील यांनी सोशल मीडियावर मोदी सरकारच्या विरोधात आणि भारतीय जनता पक्षाच्या विरोधात लिखाण केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. संग्राम पाटील हे डॉक्टर असून त्यांचे शिक्षण पुण्यातील बीजे वैद्यकीय महाविद्यालयात झाले असून ते भूलशास्त्र विषयात एमडी आहेत. ते इंग्लंडमधील विविध वैद्यकीय संस्थांशी संबंधित असून ते पेन मेडिसिन आणि अॅनेस्थेटिक्स कन्सल्टंट म्हणून कार्यरत आहेत. भाजपने सायबर पोलिसांत धाव घेत डॉ. पाटील यांच्या पोस्टवर आक्षेप घेतला होता. १४ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. संग्राम पाटील यांच्या अधिकृत फेसबुक पेजवरून एक पोस्ट करण्यात आली होती. यात 'मोदींच्या सेक्स स्कँडलबद्दल भाजपा अंधभक्त आणि ४० पैसेवाले सगळे चिडीचूप आहेत' असा आक्षेपार्ह दावा करण्यात आला होता. याच पोस्टमुळे भाजपचे सोशल मीडिया संयोजक निखिल भामरे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली असून, त्यानुसार 'शहर विकास आघाडी' आणि डॉ. पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणाला आता राजकीय वळण मिळाले आहे ते राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षाचे राज्य प्रवक्ते रविकांत वरपे यांनी केलेल्या कमेंटमुळे. डॉ. पाटलांच्या वादग्रस्त पोस्टखाली वरपे यांनी 'मोदी चीनला का घाबरत असतील?' असा सवाल उपस्थित केला आहे. भाजप डॉ. पाटील यांच्या पोस्टला 'समाजात तेढ निर्माण करणारे कृत्य' म्हणत असताना वरपे यांची कमेंट आल्याने भाजपच्या गोटात संताप व्यक्त होत आहे. डॉ. संग्राम पाटील यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळताच पुरोगामी वर्तुळातून सोशल मीडियावर या कारवाईच्या विरोधात पोस्ट सुरू झाल्या. अनेक मान्यवरांनी फेसबुक-ट्विटरद्वारे सरकारच्या या कृतीचा निषेध नोंदवला. भारतात लोकशाही जिवंत आहे का, असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. सडेतोड राजकीय भूमिका घेणाऱ्या डॉ. पाटलांना केलेली अटक ही आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची नाचक्की करणारी आहे. नेमकी काय कारणामुळे अटक केली याचा मुंबई पोलिस आणि गृह मंत्रालयाने तातडीने खुलासा करावा. या दडपशाहीचा आम्ही काँग्रेस पक्ष म्हणून धिक्कार करतो असेही सपकाळ म्हणाले. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी 'भारतात लोकशाही जिवंत आहे का' असा सवाल करत या कारवाईचा धिक्कार केला आहे. भाजपवर टीका केली म्हणून ही पोलिस चौकशी आहे का? फडणवीसांनी अक्कल गहाण टाकली का? असा सवाल करत निखिल वागळे यांनी या कारवाईला 'बिनडोक कारवाई' असे म्हटले आहे. कोरोना महामारीच्या काळात डॉ. संग्राम पाटील यांनी यूट्यूबद्वारे लोकांना वैद्यकीय मार्गदर्शन केले होते. ते एक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते आहेत याचे भान सरकारने ठेवावयास हवे होते. सोशल मीडियावर रोखठोक मत मांडणे आणि सत्याची बाजू घेणे किती महाग पडू शकते याचे हे उदाहरण म्हटले पाहिजे. परदेशातून आलेल्या एका प्रतिष्ठित व्यक्तीला अशा प्रकारे तासन्तास अडकवून ठेवणे कितपत योग्य आहे.

# भिस्तीपुरा भागात पुराच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी दूर करणार-संजय मुथा

**जालना । प्रतिनिधी**

**प्रभाग क्र. ६ मध्ये काँग्रेस महाविकास आघाडीने मुसंडी घेतली आहे. उमेदवार संजय मुथा, कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान, नजीब अहमद मोहम्मद यांनी डोअर-टू-डोअर पचार करताना ज्वलंत समस्यांना हात घालत मतदारांशी थेट नाळ जोडली आहे. आज शुक्रवारी (ता. ९) भिस्तीपुरा परिसरात काढलेल्या प्रचारफेरीचे मतदारांनी जंगी स्वागत करीत आपला पाठिंबा दर्शविला. यावेळी उमेदवार संजय मुथा यांनी भिस्तिपुरा भागातील पुरस्थितीची समस्या कायम निकाली काढण्याला प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन दिले.**



यावेळी नागरिकांनी प्रामुख्याने रस्ते, स्वच्छता आणि पावसाळ्यातील पुराच्या समस्येकडे श्री. मुथा यांचे लक्ष वेधले. गेल्या पावसाळ्यात नालेसफाई न झाल्यामुळे भिस्तीपुरा भागातील अनेकांच्या घरात पुराचे पाणी घुसल्यामुळे मोठे नुकसान झाले होते. त्याबाबत बोलताना श्री. मुथा यांनी भविष्यात अशा समस्येला सामोरे जावे लागणार नाही यादृष्टीने नियोजन करण्याची ग्वाही दिली. आम्ही केवळ वैयक्तिक टीका करण्यासाठी नव्हे तर प्रभागाचा शाश्वत विकास करण्यासाठी रिंगणात असल्याचे ते म्हणाले. हा प्रभाग शहराचा मध्यवर्ती आणि व्यापारी भाग असल्याने येथे सुरक्षिततेला अनन्यसाधारण महत्त्व असून, श्री. मुथा यांनी सराफा, कापडा बाजार आणि दाना बाजारसारख्या व्यापार पेठेत नागरिकांशी संवाद साधताना व्यापाऱ्यांच्या सुरक्षेला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. प्रलंबित प्रश्न सोडवून जालना शहराला स्वच्छ सुंदर बनविण्यासाठी काँग्रेसच्या पंजा या निशाणीसमोरील बटन दाबून मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन श्री. मुथा यांनी यावेळी केले.

# केवळ घोषणा नाही, तर ठोस कृती' ब्रीदने मुथा यांची मतदारांच्या मनावर पकड

**जालना । प्रतिनिधी**

**जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीचा ज्वर आता शिगेला पोहोचला असून, प्रभाग ६ मध्ये राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार संजय मुथा यांनी आपल्या पॅनेलसह प्रचारात घेतलेली आघाडी विरोधकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. केवळ घोषणा नाही, तर ठोस कृती हे ब्रीदवाक्य घेऊन मुथा यांनी मतदारांच्या मनावर पकड मिळवली आहे.**

निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात संजय मुथा यांच्यासह त्यांच्या पॅनेलचे उमेदवार कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान आणि नजीब अहमद मोहम्मद यांनी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला आहे. विशेषतः बैदपुरा, खडकपुरा



आणि जैन मंदिर परिसर या भागांत झालेल्या 'डोअर-टू-डोअर' प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जालना हे व्यापारी शहर असल्याने, व्यापाऱ्यांच्या समस्यांना संजय मुथा यांनी केंद्रस्थानी ठेवले आहे. जनतेने आमच्यावर दाखवलेला विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. प्रभाग ६ ला शहराचा एक 'मॉडेल प्रभाग' म्हणून विकसित करणे हेच आमचे ध्येय आहे, असे संजय मुथा यांनी ठिकठिकाणी प्रचार फेरी आणि कॉर्नर बैठकात बोलताना स्पष्ट केले. राजकीय वर्तुळात सध्या प्रभाग ६ मधील 'काँग्रेस महावादळा'ची मोठी चर्चा आहे. सुशिक्षित आणि तरुण मतदार संजय मुथा यांच्या विकासवादी व्हिजनकडे आकर्षित होत असल्याचे चित्र आहे. विरोधकांकडून होणाऱ्या केवळ टीका-टिप्पणीपेक्षा मुथा यांनी मांडलेली सुरक्षितता, रोजगार आणि पारदर्शकता ही त्रिसूत्री मतदारांना अधिक आश्वासक वाटत आहे.

पान १ वरून...

## ...तर शेतकरी बनेल

कमी होतो आणि जलसंधारणास चालना मिळते. सौर पॅनल्सच्या सावलीखाली मूग, गवार, मोठ, इसबगोल, जिरे, हरभरा, बटाटा, वांगी यांसारखी पिके वाढतात. नियंत्रित सूर्यप्रकाशामुळे उष्णतेचा ताण कमी होतो, त्यामुळे उत्पादन सातत्याने मिळते. शिवाय वन्य प्राणी आणि जास्त सूर्यप्रकाशापासून पिकांचे संरक्षण होते.

-----------

## समाजाच्या विरोधात गेले,

जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा स्थानिक लेव्हलच्या निवडणुकीत मी पडतच नाही, आपल्याला टप्पू (मोठा) मासा लागतो, त्याला जर माज असेल तर तो माज मी उतरवलाच म्हणून समजा असेही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

-----------

## जिल्हा परिषदच्या निवडणुकांना

निवडणुका वेळेत घेणे शक्य नाही, असा युक्तिवाद आयोगाने केला होता. काही ठिकाणी आरक्षणाचा पेच कायम आहे. त्यामुळे मुदतवाढ देण्याची मागणी आयोगाने न्यायालयाकडे केली. राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये आरक्षण ५० टक्के मर्यादेत असले तरी, उर्वरित २० जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये ही मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी निवडणुका कशा घ्यायच्या आणि आरक्षणासंदर्भात कोणता निर्णय घ्यायचा, याबाबत कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर १२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाची मागणी मान्य करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पुढे ढकलण्यास परवानगी दिली. न्यायालयाने १५ दिवसांची अतिरिक्त मुदत देऊन १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या प्रशासक राजवटीखाली कारभार सुरू असून, लोकप्रतिनिधींच्या निवडीसाठी ही निवडणूक महत्त्वाची मानली जात आहे. तसेच आरक्षणाचा प्रश्न सुटण्यावर निवडणुकांचे अंतिम वेळापत्रक अवलंबून राहणार आहे.

--------------

## अखेर परळी नगरपरिषदेतून

नाहीत,'' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी राष्ट्रवादीला इशारा दिला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या युतीवर टीका केली होती. विरोधकांच्या या टीकेनंतर आणि शिंदे गटाच्या इशाऱ्यानंतर रविवारी एमआयएमच्या नगरसेविका आयेशा मोहसीन शेख यांनी राष्ट्रवादीचे गटनेते वैजनाथ सोळंके यांना पत्र पाठवले. या पत्रात त्यांनी आपण या गटामधून बाहेर पडत असल्याचे स्पष्ट केले असून, पत्राची प्रत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनाही पाठवण्यात आली आहे.

-----------

## अकोल्यात भाजप-एमआयएम

यात ताज राणा यांनी वेळ निघून गेल्यावर उमेदवारी दाखल केल्याचे कारण देत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आला नसल्याचे सांगितले. तसेच एमआयएमच्या पाचही नगरसेवकांनी भाजपच्या जितेन बरेठिया यांना समर्थन दर्शवल्याने ही भाजप-एमआयएमची अप्रत्यक्ष युतीच असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, अकोल्याच्या अकोटमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या भाजप-एमआयएम युतीवर चांगलाच गदारोळ निर्माण झाला होता. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही युती तोडण्याचे आदेश दिले. तसेच युतीसाठी जबाबदार धरत स्थानिक आमदार प्रकाश भारसाखळे यांना भाजपने कारने दाखवा नोटीस पाठवली. या घटनेनंतर एमआयएम भाजपच्या नेतृत्वाखालील अकोट विकास मंचातून बाहेर पडला होता. यानंतर एमआयएमच्या पाच नगरसेवकांनी स्वत:चा गट स्थापन केला होता. मात्र, पहिल्या युतीने वाद झाल्यानंतर सोमवारी परत ही युती नव्याने वेगळ्या रूपात समोर आली आहे.

------------

## धनंजय मुंडे लवकरच

झालेल्या परिस्थिती मध्ये जनभावनेचा विचार करून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला गेला होता. त्या प्रकरणात चौकशी देखील पूर्ण झाली असून यामध्ये कुठेही धनंजय मुंडे यांचे नाव नाही, त्यांच्यावर कुठलाही आरोप नाही, तसेच कुठेही त्यांचा संबंध आढळून आलेला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील केले जाईल, असे वक्तव्य पटेल यांनी केले आहे. विशेष म्हणजे चार दिवसांपूर्वी प्रफुल्ल पटेल यांनी एका दुसऱ्या वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देखील असेच वक्तव्य केले होते, त्यानंतर सोमवारी एका राष्ट्रीय वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट वक्तव्य केले आहे. दरम्यान, कुठल्याही चौकशीत धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नसून ते लवकरच मंत्री म्हणून काम करताना दिसतील असे स्पष्ट करत प्रफुल्ल पटेल यांनी सुसंकेत दिले आहेत. काही दिवसांपूर्वीच धनंजय मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेतल्याने या चर्चांना सुरुवात झाली होती. नुकतेच बीड येथील एका कार्यक्रमानंतर धनंजय मुंडे आपला पुढील दौरा अचानक रद्द करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत हेलिकॉप्टर मधून गेले, त्यामुळेही राज्यातील राजकारणात मोठी चर्चा झाली होती. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला असल्याचे दिसून येते.

-----------

## एससी-एसटी आरक्षण

३२ अंतर्गत दाखल केलेल्या याचिकेवर केंद्र सरकार तसेच सर्व राज्य सरकारांकडून उत्तर मागवले. सर्वोच्च न्यायालयात हजर राहून उपाध्याय यांनी युक्तिवाद केला की, ज्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जाती/जमाती कुटुंबातील एखाद्या सदस्याने आधीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पद मिळवले आहे, अशा व्यक्तीच्या मुलांना आरक्षणाचे फायदे घेण्याची परवानगी दिली जाऊ नये. त्यांनी युक्तिवाद केला की, अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत कुटुंबांना आरक्षण देणे सुरू ठेवल्याने सकारात्मक कृतीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जातो. याचिकेत म्हटले आहे की, खोलवर रुजलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाने ग्रस्त असलेल्यांच्या उन्नतीसाठी आरक्षण हा एक उपचारात्मक आणि तात्पुरता उपाय म्हणून सुरू करण्यात आला होता, परंतु कालांतराने, अनुसूचित जाती/जमाती समुदायांमध्ये एक उच्चभ्रू वर्ग उदयास आला आहे, ज्याने आधीच सामाजिक प्रगती आणि आर्थिक स्थिरता प्राप्त केली आहे. या प्रगतीनंतरही, असे वर्ग पिढ्यानपिढ्या आरक्षणाचे फायदे लाटत आहेत, ज्यामुळे समाजातील सर्वात दुर्बळ सदस्य वंचित राहत आहेत, असे याचिकेत म्हटले आहे. घटना समितीच्या चर्चांचा संदर्भ देत, याचिकेत सादर करण्यात आले की, आरक्षण कधीही वंशपरंपरागत हक्क म्हणून अभिप्रेत नव्हता. सकारात्मक कृती गतिशील असावी आणि ती वेळोवेळी पुनरावलोकनाच्या अधीन असावी, हे प्रतिपादन करण्यासाठी डॉ. बी.आर. आंबेडकर आणि इतर घटनाकारांच्या मतांचा संदर्भ देण्यात आला.

----------

## चिमुकलीवर अत्याचार

आधारावर यातील मुख्य आरोपी सुंदर निवृत्ती तायड,वय वर्ष ३४ रा. रामपुरी या सत्र न्यायाधीश बीड शिंदे मॅडम यांनी आरोपीने केलेला गुन्हा तपासात सिद्ध झाल्याने दिं. १२/१/२०२६ रोजी आरोपी सुंदर निवृत्ती तायड यास जन्मठेप सुनावली आहे. या गुन्ह्यात पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी म्हणून महिला पोलीस हवालदार गव्हाणे मॅडम यांनी मोलाची कामगिरी केली आहे. चिमुकलीवर झालेल्या बलात्कार प्रकरणी अखेर पोलिसांनी केलेल्या तपासाला यश मिळाले असून चिमुकलीला न्याय मिळवून देण्याचे काम तलवाडा पोलिसांनी केले आहे. सदरच्या माननीय न्यायालयाच्या निकालामुळे जनतेमध्ये समाधान व्यक्त केले जात असून पोलिसांवरील व न्यायव्यवस्थेवरील विश्वास आणखीन मजबूत होत चाललेला आहे.

----------

## यापेक्षा मुर्खपणाचं दुसरं स्टेटमेंट

केवळ पाट्या लागल्या होत्या. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर सगळ्या अडचणी दूर केल्या आणि हे विमानतळ बांधले. विमानतळ बांधले तेंव्हा उद्योगपती अदानींचे नव्हते. याचे टेंडर जिव्हिकेला मिळाले होते. नंतर जिव्हिकेने आपले शेअर डायलूट केले आणि अदानी यांनी ते टेकओव्हर केले. आम्ही काही अदानींना दिले नव्हते. आम्ही जिव्हिकेला दिले होते. चार वर्षांनी अदानींनी तो घेतला, अशी माहिती फडणवीसांनी दिली. त्यांना भूगोल कळत नाही. गुजरातचा तुम्ही पोर्ट बघितला तर तो चिंचोळ्या भागात आहे. तिथे विमानतळ आहे. त्या विमानतळचे ते काय करतील? याउलट वाढवण बंदराने सर्वात मोठे नुकसान गुजरातचे आहे. आजपर्यंत तिथे गुजरातचा एक पोर्ट होता. सगळा माल आपला त्या पोर्टवर यायचा. आता त्यापेक्षा दहा पटीने मोठा पोर्ट आपण केला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. मला एकच समजवून सांगा. ही काय गाडी आहे का चालवत दुसरीकडे घेऊन जाता येते? पार्क करता येते? किती वेड्यासारखे हे बोलणे आहे? मला असे वाटते की, चर्चेला काहीतरी स्तर असले पाहिजे. मी पहिल्यातल्या किंवा पाचवीतल्या मुलाशी चर्चा करतोय का? त्या मुलांना कळेल अशा गोष्टी त्यांना कळत नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

--------

## लाडक्या बहिणिंना हप्ता

'मोठी भेट' म्हणून दोन महिन्यांचा लाभ एकत्र देण्याची घोषणा केली होती. मंत्री गिरीश महाजन यांनी सोशल मीडियावरही याबाबत पोस्ट केली होती की, १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर आणि जानेवारीचे तीन हजार रुपये जमा होणार. या घोषणेनंतर विरोधी पक्षांकडून आणि विविध संघटनांकडून तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे दाखल झाल्या. या तक्रारींमध्ये असा दावा करण्यात आला होता की, निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारे लाभ देणे हे मतदारांना प्रलोभन देण्याचा प्रयत्न आहे आणि आचारसंहितेचे उल्लंघन आहे. या तक्रारींची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने मुख्य सचिवांकडून योजनेबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागितले. मुख्य सचिवांनी आपल्या अहवालात सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेचे एकत्रित आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी सुरू झालेल्या विकासकामे आणि योजनांचे नियमित लाभ आचारसंहितेच्या काळातही सुरू ठेवता येतात. मात्र, योजनेच्या अग्रिम लाभाबाबत आयोगाने कठोर भूमिका घेतली आहे. आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ (उदा. डिसेंबरचा थकलेला हप्ता) देता येईल. तसेच जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरूपात देता येणार नाही. याचबरोबर नवीन लाभार्थीदेखील जोडता येणार नाहीत. या निर्णयामुळे सत्ताधारी सरकारला मोठा राजकीय धक्का बसला आहे. कारण निवडणुकीच्या तोंडावर मकर संक्रांतीच्या निमित्ताने दोन महिन्यांचा लाभ एकत्र देऊन महिला मतदारांमध्ये सकारात्मक संदेश देण्याची रणनीती आखली जात होती. आता फक्त डिसेंबरचा नियमित हप्ता जमा होऊ शकतो, तर जानेवारीचा हप्ता निवडणुकीनंतरच मिळेल. राजकीय वर्तुळात याला सरकारच्या 'महिला केंद्रित' योजनेवर मोठा ब्रेक मानले जात आहे. विरोधी पक्षांनी याचा स्वागत करताना म्हटले आहे की, निवडणुकीत पैशाच्या जोरावर मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न हाणून पाडला गेला आहे. दुसरीकडे, महायुतीकडून याला आचारसंहितेचे योग्य पालन म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिला मतदारांसाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असल्याने, आयोगाच्या या निर्णयाचा निवडणुकीवर काय परिणाम होईल, हे आता पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## दापोलीत संत भगवानबाबा व वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा उत्साहात संपन्न!

**दापोली ।प्रतिनिधी**

**ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा व वैराग्यमूर्ती पूज्य वामनभाऊ महाराज यांच्या संयुक्त पुण्यतिथीनिमित्त आयोजित स्मृतिसोहळा शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी दापोली येथे अत्यंत भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दापोली व परिसरातील वंजारी समाजातील नागरिक, अधिकारी, कार्यकर्ते व भाविकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या कार्यक्रमाला शोभा आणली.**



कार्यक्रमाची सुरुवात पद्मश्री दादा ईदाते यांच्या शुभहस्ते झाली. पद्मश्री दादांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासोबतच्या सामाजिक कार्याच्या आठवणी सांगत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या अध्यक्षा संपदा पारकर यांनी ''आज वंजारी समाजातील युवक विविध क्षेत्रांत अधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्यरत आहेत, ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे,'' असे मत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली यांनी शिक्षण, स्पर्धा परीक्षा व समाजातील तरुणांच्या प्रगतीबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र यांनी कुटुंबसंस्कार, शिक्षण आणि सामाजिक अस्मिता यांचे महत्त्व स्पष्ट करत ''मी वंजारी आहे'' ही ओळख अभिमानाने जपा, असा संदेश दिला. सायंकाळी ह. भ. प. सुदर्शन महाराज शास्त्री (पाथर्डी) यांच्या प्रभावी प्रवचनाने कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. ''देव कुणाला प्रत्यक्ष दिसत नाही'' या विषयावर त्यांनी शिक्षणाच्या महत्त्वाचे अत्यंत हृदयस्पर्शी उदाहरण सांगत समाजाला दिशा देणारे विचार मांडले. त्यांनी सांगितलेली कथा उपस्थित भाविकांच्या मनाला स्पर्श करून गेली. या पुण्यतिथी सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही औपचारिक अध्यक्ष अथवा संयोजक नसतानाही सर्व समाजबांधवांनी एकत्र येत सामूहिक नियोजनातून हा उपक्रम अत्यंत यशस्वी केला. प्रवचनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल गोकुळ घुले यांनी सर्व समाजबांधवांचे मनःपूर्वक आभार मानले.

पान ६ वरून...

## सोनेगाव येथील शेतकऱ्यांना

दुर्लक्ष करत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. ''पवनचक्की प्रकल्पासाठी शेतकऱ्यांचे सहकार्य असतानाही आम्हाला वेठीस धरून स्थानिक हस्तकांच्या माध्यमातून कामे केली जात आहेत. शेतकऱ्यांच्या कष्टाने जोपासलेल्या झाडांची कत्तल उघड्या डोळ्यांनी पाहावी लागत असून हे अत्यंत वेदनादायक आहे.'' या संपूर्ण प्रकरणात स्थानिक प्रशासन, वनविभाग व लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी सोनेगाव येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी केली आहे.

-------------

## अवैद्य वाळू उपसा करणाऱ्यावर

तहसीलदार शेळके यांच्यासह महसूल कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर थांबवून कागदपत्रांची मागणी केली असता कोणतेही वैध परवाने अथवा रॉयल्टी पावती सादर करण्यात आली नाही . कारवाईदरम्यान संबंधित आरोपी अफसर शेख याने महसूल कर्मचाऱ्यांची दिशाभूल करून ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेले . याबाबत पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे . त्यानंतर लगेचच त्याच परिसरात दुसरे एक ट्रॅक्टर महसूल पथकाच्या निदर्शनास आले . सदर ट्रॅक्टर सुनील बेदरे यांचे असल्याचे निष्पन्न झाले . तपासणीदरम्यान या ट्रॅक्टरमधूनही अवैधरित्या वाळू वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले . या प्रकरणी महसूल पथकाने ट्रॅक्टर व ट्रॉली ताब्यात घेतली असून , चालक व मालकाविरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे .छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या सातत्यपूर्ण सूचनांनुसार गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर कठोर कारवाया करण्यात येत आहेत . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अवैध वाळू वाहतुकीवर शून्य सहनशीलतेचे धोरण राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्याकडून याबाबत नियमित आढावा घेतला जात असून , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचा मंडळाधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे सातत्याने तगादा असतो . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या अवैध चोरट्या वाहतुकीविरोधात सक्रिय असून , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्यात कुठेही अवैधरित्या वाळू वाहतूक खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे .या कारवाईत पारगाव सिरस विभागाच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप व दादासाहेब शेळके तसेच महसूल सहायक भरत भंडाणे यांनी सक्रिय सहभाग घेतला. महसूल प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, पुढील काळातही अशा प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे .

----------

## महाजनवाडी-बीड ते अयोध्याधाम

उपस्थित होते. हा रथयात्रा सोहळा महाजनवाडी - बीड - पैठण - छत्रपती संभाजीनगर - श्रीक्षेत्र घृष्णेश्वर - बुलढाणा - श्री क्षेत्र शेगाव - अकोला- अमरावती- नागपूर- रामटेक - जबलपूर- मैहर- चित्रकूट - श्रीक्षेत्र प्रयाग्रज - श्रीक्षेत्र वाराणसी - श्रीक्षेत्र काशी - आणि अयोध्याधाम असा प्रवासाचा मार्ग असणार आहे.. हा प्रवास ७५ दिवस असून २००० की. मीटरचा आहे..

--------------

## आ.प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त

करण्यात आला असून शिवश्री रविंद्र भाऊसाहेब जगदाळे (इतिहास संशोधक व शस्त्र-अभ्यासक) यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन दुर्मिळ शस्त्रसंग्रहाचे सादरीकरण होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वात भव्य अशा ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे दर्शन नागरिकांना घेता येणार आहे. तलवारी, भाले, कट्यारी, ढाली, तोफगोळे, जुनी युद्धसामग्री यासह प्रत्यक्ष युद्ध कौशल्यांचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. कार्यक्रम दि. १३ व १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून इतिहासाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.या भव्य उपक्रमासोबतच आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक संदेश देणारा उपक्रमही राबविण्यात येत आहे. शुभेच्छा देताना शाल, श्रीफळ, हार, बुके यांसारख्या औपचारिक भेटवस्तूंऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य व शाळांसाठी प्रथमोपचार किट भेट देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. यामुळे अनावश्यक खर्च टळून तोच निधी समाजोपयोगी कार्यासाठी उपयोगात येणार आहे. या उपक्रमात वही, पुस्तके, पेन, रंगसाहित्य, दप्तर, पाण्याच्या बाटल्या तसेच औषध पेट्या, बँडेज, सॅनिटायझर, थर्मामीटर आदी साहित्य स्वीकारण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव, लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, माजलगाव, जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग व फिजिओथेरपी, सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, माजलगाव मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, कणिफनाथ माध्यमिक विद्यालय मोहखेड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. हा उपक्रम शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राष्ट्रभक्तीची भावना जागवणारा ठरणार असून विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

--------------

## गंगावाडी, येथील शेतकऱ्यांच्या

रात्रीच्या दरम्यान गोदाकाठी कोणी नसल्याचा फायदा उचलत चोरट्यांनी पन्नास शेतकऱ्यांच्या मोटारीचे केबल वायर काढून हे वायर घटनास्थळी जावून होळी करून ताबा लंपास केला आहे. चोरट्यांनी वायरची चोरी केल्याने गोदाकाठ परिसरात एकच खळबळ उडाली. एका मोटारीच्या वायरची किंमत जवळ जवळपास सात ते आठ हजार रुपये इतकी आहे. म्हणजेच लाखों रुपयांचा वायरची चोरी चोरट्यांनी केली गोदाकाठ परिसरात वायर आणि मोटारी चोरणारी टोळी सक्रिय असून या चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

------------

## पोलीस कर्मचाऱ्यावर

पीडितेने जेव्हा जेव्हा लग्नाबाबत विचारणा केली, तेव्हा तो काहीतरी कारण सांगून टाळाटाळ करत होता. काही दिवसांपूर्वी पीडितेने लग्नासाठी तगादा लावला असता, आरोपीने तिला स्पष्टपणे लग्नास नकार दिला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे ठरवले. तिने थेट अंभोरा पोलीगास ठाणे ठून आपली आपबिती सांगितली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

जा.क्र./, न.प.अंबड /नामांतर/२०२५/७४४
कार्यालय नगर परिषद अंबड
दिनांक १७/१२/२०२५

## नांव बदलण्याचा जाहीरनामा

अर्जदार श्री. सौ.श्रीमती:- जयश्री गंगाधर घायतडक

प्रकरण: सर्वे नं - ३५ सहल प्लॉट नं-१२ न.प.मि.नं-१८-९६-१२ चे हस्तांतरण बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-९६-१२ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतुःसीमा:** पुर्व :- आव्हाड यांचे घर, पश्चिम :- गंगाधर नामदेव घावतडक यांचे घर, दक्षिण :- कॉलनी अंतर्गत रस्ता, उत्तर :- ओपन स्पेस

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

पाटोदा : नवगण शिक्षण संस्थेचे वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे १२ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या व महिला तक्रार निवारण समितीच्या राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना प्राचार्य डॉ. बळीराम राख म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी स्वराज्य निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तित्व निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी समतेचा वारसा पुढे चालवला आहे.व स्वामी विवेकानंद यांनी युवा वर्गात आत्मविश्वास निर्माण केला. राजमाता जिजाऊ आणि व स्वामी विवेकानंद यांचा समाजाने आदर्श घ्यावा असे प्रतिपादन आदर्श प्राचार्य डॉ.बळीराम राख यांनी केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६



# माजी नगराध्यक्ष यांच्याकडून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान

### लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट, गेवराई धर्मदाय निरीक्षकाच्या मिलीभगतीचा संशय | अवमान याचिकेसह धर्मदाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे तक्रार करणार–रामनाथ खोड

गेवराई । प्रतिनिधी

येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट अंतर्गत मौजे कोल्हेर व मौजे लुकामसला येथील देवस्थान शेतजमिनीतील ऊस पिकासंदर्भात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी धर्मदाय उप आयुक्त, बीड यांच्या दिनांक २१/११/२०२५ च्या आदेशास स्थगिती देऊन मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचा दिनांक ०५/०४/२०२१ चा आदेश कायम ठेवलेला आहे. सदर ०५/०४/२०२१ च्या आदेशानुसार देवस्थान जमिनीतील ऊस कारखान्याला घालण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पाळणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मात्र या आदेशाला डावलून कार्यवाही सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.





या संदर्भात तक्रारदार रामनाथ खोड यांनी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी धर्मदाय उप आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार सादर करून, देवस्थानचे डि-फॉल्टी ट्रस्टी राधेश्याम अट्टल व इतर तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करत परस्पर देवस्थान जमिनीतील ऊस तोडून तो कारखान्याला घातल्याचा आरोप केला आहे. तक्रारीनुसार, गंगामाया साखर कारखान्याशी संबंधित कचरे यांच्या टोळ्या व स्लिप बॉय सचिन पवार यांच्या मदतीने देवस्थानच्या शेतात बळजबरीने प्रवेश करून ऊस काढणी करण्यात आली असून ही बाब मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाला झुगारून दिल्याचा थेट प्रकार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणी धर्मदाय उप आयुक्तांनी निरीक्षकांना आदेश दिले असतानाही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संबंधित निरीक्षकांच्या भूमिकेबाबत मिलीभगतीचा संशय व्यक्त केला जात आहे. मा. उच्च न्यायालयाचा आदेश अस्तित्वात असताना देवस्थान मालमत्तेचा असा बेकायदेशीर वापर होणे ही बाब सार्वजनिक न्यास व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असून, या प्रकरणी लवकरच मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती तक्रारदार रामनाथ खोड यांनी दिली आहे.

## समृद्ध समाजाच्या निर्मितीसाठी महिलांना मानसिक शिक्षणाची गरज–ज्योती रकटे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालय व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिराच्या. ३ बौद्धिक क्षेत्राच्या कार्यक्रमात प्राध्यापक ज्योति रकटे मॅडम आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक आरोग्य टिकवण्यासाठी व महिलांना मानसिक तणावापासून दूर करण्यासाठी महिलांनी शिक्षण घेऊन आपला बौद्धिक विकास करावा व मानसिक तणावापासून सुरक्षा मिळवावी अशी आव्हान या बौद्धिक क्षेत्रात केले महिलांच्या सुरक्षा आणि मानसिक आरोग्य या विषयावर आज हिवाळी विशेष शिबिरात या बौद्धिक क्षेत्राचे आयोजन करण्यात आले.





या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ वंदन जाधव सर प्रमुख पाहुणे म्हणून अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे समन्वयक प्राध्यापक विनोद कीदक कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक प्रकाशजी नाईकवाडे सर त्याचबरोबर आमच्या संगणक शास्त्री विभागाचे प्रमुख प्राध्यापक दीपक जावळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक पापाजी चव्हाण सर यांनी केले तर आभार प्राध्यापक डॉ नारायण फुने यांनी केले या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना प्राध्यापक ज्योतिरक्ती यांनी समाजाची आरोग्य खऱ्या अर्थाने जर सुधरायचे असेल तर महिलांना शिक्षणाबरोबर मानसिक शिक्षणाची समुपदेशन करणे गरजेचे आहे असे आव्हान केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ वंदन जाधव यांनी कार्यक्रमाचा समारोप करीत असताना महिलांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी समाजाने सकारात्मक भूमिका घेतली पाहिजेत पुरुषप्रधान संस्कृतीचा त्याग करून समाधीचा विचार समाजात उजवला पाहिजे असे आव्हान केले या कार्यक्रमासाठी आभार प्राध्यापक डॉ कल्पना घारगे मॅडम यांनी मांडले पापाजी चव्हाण प्राध्यापक प्राध्यापक बाप्पू प्राध्यापक डॉ लोखंडे प्राध्यापक बापू घोक्षे श्री ईश्वर काळे शाळेची सहशिक्षक श्री राख सर यांनी सहकार्य केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईश्वर काळे उमाजी काळे महादेव काळे विशाल काळे यांनी सहकार्य केले स्वयंसेवक अरविंद सिंग आणि पायल मुळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले या कार्यक्रमात लहान मुलांना ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आले त्याचबरोबर भारताच्या राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेची जनजागृती करण्यासाठी वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी महादेव काळे उमाजी काळे बंडोपंत काळे अरुण काळे विशाल काळे काळे बिरोबा काळे अशोक काळे उपस्थित होते

## शाहू महाराज मूकबधिर विद्यालयाने पटकावले सांघिक विजेतपद

आष्टी । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा व कला स्पर्धेमध्ये आष्टी येथील शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाची पाच द्वितीय क्रमांकाची तीन व तृतीय क्रमांक एक असे एकूण नऊ पारितोषिक मिळून बीड जिल्ह्यातील मूकबधिर प्रवर्गातून सांघिक विजेतपद मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता नखाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



बीड जिल्ह्यातील सर्वच दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय बीड व कै.सुमतीताई गुणाले मतिमंद विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथे बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील मुला मुलींच्या वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन अंबाजोगाई येथे ०७ जानेवारी ते ०९ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आले तर या कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान, शिक्षण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैसाका नखाते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले तर कार्यक्रमाचे बक्षीस वितरण वितरण जिल्हा सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील व वैसाखा नकाते साहेब यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेत आष्टी येथील शाहू महाराज मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेत प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे एकूण ०९ बक्षीस मिळवत या स्पर्धेत घवघवीचे यश संपादन केले आहे या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन बक्षीस मिळवले आहेत यामध्ये जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६ दि.०७ते ०९ जानेवारी २०२६ १). गायकवाड ओम गजानन १७-२१. लांबउडी प्रथम २)पोठरे राजेश दत्तात्रय ८-१२. लांब उडी प्रथम ३)कदम श्रीकांत आनंदराव १२-१६. लांब उडी प्रथम ४)गोडगे रविकांत चंद्रकांत १२-१६ गोळा फेक प्रथम ५) गायकवाड ओम गजानन १७-२१ गोळा फेक प्रथम द्वितीय क्रमांक १) पोठरे राजेश दत्तात्रय ८-१२.धावणे.५०.मी. दुतीय २)भिल्ल सखाराम जगन १२-१६ धावणे.२०० मी द्वितीय ३)ननवरे निलेश ज्ञानेश्वर ८-१२ धावणे ५० मी. द्वितीय तृतीय क्रमांक भिल्ल सखाराम जगन १२-१६. धावणे.४०० मी. या विजेत्या विद्यार्थ्यांचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता नखाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक सुधीर तोडकर, कांबळे सर ,आजबे मॅडम, मस्के सर यांनी परिश्रम घेतले .या सर्वांचे अभिनंदन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ सवणे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ता.शाखा माजलगाव महत्त्वपूर्ण बैठक रविवार दि. ११ रोजी दुपारी २.०० वाजता रविदास छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती माजलगाव अध्यक्षपदी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांची एकमताने निवड झाली.



जयंती सचिव मयूर वाघमारे, कोषाध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर यांची यावेळी निवड करण्यात आली.

या बैठकीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कर्मचारी माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष ऍड.गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर,पद्माकर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश आगवणे, सचिन वाघमारे,भगवान सोनवणे, प्रसाद वाघमोडे, संतोष पोहेकर, रणवीर काबला, अशोक सोनटक्के,विजय नरहिर,अशोक भालशंकर, विकास गायकवाड यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.

## राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने अभिवादन



किल्लेधारुर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग, सांस्कृतिक विभाग, आजीवन शिक्षण व विस्तार केंद्र व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने प्रतिमेस माजी सैनिक श्री. पांडुरंग श्रीपती शिनगारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुका विधी सेवा समिती धारूरचे अध्यक्ष ॲड. परमेश्वर शिनगारे यांनी यावेळी उपस्थितांना राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्याची माहिती देताना महाराष्ट्राला रयतेचे राजे छत्रपती शिवराय व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांसारखे युगपुरुष दिले. तर जगाला बंधू आणि भगिनींनो असं संबोधणारे ज्ञानसागर स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. यावेळी उपस्थित आमच्या हस्ते बारामती येथे संपन्न झालेल्या करियर कट्टा उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या शुभम चाळक, सुरवसे ओम, बंडगर निखिल, पवार रोहित, मुंडे कृष्णा, शुभम गवरकर डॉ. विजयकुमार कुंभारे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. याप्रसंगी करिअर कट्टा प्रमुख डॉ. एल. बी. जाधवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

## धारूर महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत ग्रंथालयच्या वतीने आयोजित वाचन कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. शिवशंकर घमुरे यांनी सांगितले की, वाचन ही केवळ सवय नसून ती व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया आहे. योग्य वाचनामुळे भाषा समृद्ध होते विचारांना दिशा मिळते आणि चिकित्सक दृष्टिकोन विकसित होतो. आजच्या डिजिटल युगात माहितीचा साठा प्रचंड प्रमाणात वाढला आहे मात्र त्यातून योग्य माहिती निवडणे, समजून घेणे आणि तिचा अभ्यास, संशोधन व जीवनातील निर्णयप्रक्रियेत उपयोग करणे हेच खरे वाचनकौशल्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले तसेच पाठ्यपुस्तकांपलीकडे जाऊन संदर्भग्रंथ, ई-बुक्स, जर्नल्स आणि विश्वासार्ह डिजिटल स्रोतांचा वापर करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. गोपाळ काकडे यांनी सांगितले की, वाचनामुळे व्यक्ती विचारशील, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक बनते. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून ग्रंथालयाशी दृढ नाते जोडावे आणि ज्ञानप्राप्तीसाठी पुस्तकांशी मैत्री करावी असे नमूद केले. महाविद्यालयातील वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास विविध विभागांतील प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक व वाचक मोठ्या संख्येने ऑनलाईन सहभागी झाले होते. सहभागी वाचकांनी कार्यशाळा अत्यंत उपयुक्त, मार्गदर्शक व प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. गोपाळ सगर यांनी केले.

## शेकापच शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणू शकतो–भाई देवकर

माजलगाव

शेतकरी, कामगार आणि कष्टकरी यांच्या प्रश्नावर सातत्याने लढणाऱ्या तसेच मार्क्सवाद आणि सत्यशोधक विचारधारा केंद्रस्थानी ठेवून गेल्या अनेक वर्षापासून काम करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा अधिवेशन माजलगाव येथे छत्रपती संभाजी महाराज चौकातील सुखसागर हॉटेलच्या सभागृहात दि.११ जानेवारी रोजी संपन्न झाले, अधिवेशनाची सुरुवात बळीराजा व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली, सुरुवातीस शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते भाई लक्ष्मणराव गोळेगावकर नाना यांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेकापचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन सहचिटणीस भाई प्रा. डॉ .उमाकांत राठोड, शिक्षक संघटनेचे राज्यध्यक्ष भाई प्रा. डॉ .चंद्रकांत चव्हाण, रस्ते महामार्ग बाधित शेतकरी कामगार आघाडीचे राज्य अध्यक्ष भाई दिगांबर कांबळे, राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड, मध्यवर्ती समिती सदस्य भाई शिवाजीराव सुरवसे, मध्यवर्ती समिती सदस्य भाई इम्रान शेख यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना भाई बाबासाहेब देवकर यांनी शेतकरी कामगार पक्षच शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणू शकतो असा विश्वास व्यक्त केला, तर भाई उमाकांत राठोड यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करून आपला विचार घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले, तर भाई दिगांबर कांबळे यांनी बीड जिल्ह्याला डाव्या विचारांचा खूप मोठा वारसा असल्याचे सांगून क्रांतिसिंह नाना पाटलांचा विचार शेतकऱ्यांच्या घराघरात पोहोचविण्याचे आवाहन केले, भाई चंद्रकांत चव्हाण यांनी सरकार शेतकरी विरोधी असल्याने शेतकऱ्यांच्या एकीची मशाल पेटवल्या शिवाय पर्याय नसल्याचे सांगितले.तर भाई विष्णुपंत घोलप यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात एकजुटीने काम करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमकपणे लढा उभारण्याचा विश्वास दिला तर भाई मोहन गुंड यांनी पुन्हा एकदा बीड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला करण्यासाठी कामाला लागण्याची आव्हान केले, यावेळी डाव्या चळवळीचे कॉ.बाबा सर, सय्यद याकूब, तुकाराम नावडकर तसेच आंबेडकरी चळवळीतील धमानंद साळवे यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या, शेवटी एकमताने शेतकरी कामगार पक्षाची कार्यकारणी निवडण्यात आली, बीड जिल्हा अधिवेशनात जिल्हा चिटणीसपदी भाई ॲड.नारायण गोले पाटील (पुर्व),भाई बापुसाहेब साळुंके (पश्चिम) तर संघटकपदी भाई धनंजय मुळे, खजिनदार भाई अशोक रोडे,तर चिटणीस मंडळ सदस्य पदी भाई माऊली जाधव (परळी), भाई मुंजा पांचाळ (माजलगाव), भाई राहुल सोळंके, (माजलगाव), भाई अनिल कदम (वडवणी), भाई नवनाथ जाधव (आंबेजोगाई), भाई शिवाजीराव सुरवसे (आष्टी), भाई विष्णूपंत घोलप (पाटोदा), महिला आघाडीच्या समन्वयक शिवकन्या मोहन गुंड, तेजस्विनी उबाळे यांची निवड करण्यात आली तर पक्षाच्या विविध आघाड्या लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे भाई मोहन गुंड यांनी सांगितले या वेळी नवीन कार्यकारणीचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या, शेवटी भाई अॅड नारायण गोले पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या महिला सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ११४९/२०२६**
**कृष्णा बजरंग यमगर विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी हवेली**

पहा
१.कृष्णा बजरंग यमगर रा. तांदळवाडी (हवेली) ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक कृष्णा बजरंग यमगर यांचा दिनांक १४/०३/१९९५ रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस तांदळवाडी (हवेली) ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी (हवेली) ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# भारताच्या शेती क्षेत्राची १० वर्षांत ४.४२ टक्के दराने वाढ

## चीनला मागे टाकले– नीती आयोग



पुणे : देशाच्या शेती क्षेत्रात २०१५२०१६ ते २०२४२०२५ दरम्यानच्या कालावधीत एकाही वर्षी नकारात्मक वाढ दिसून आली नाही. कोरोना सारख्या महामारीच्या प्रतिकूल परिस्थितीतही देशाला शेती क्षेत्रानेच देशाला तारले. २०१५-२०२४ दरम्यान भारताच्या शेती विकासाचा दर ४.४२ टक्के होता. जो चीनच्या ४.१० टक्के विकास दराच्या तुलनेत अधिक राहिला. याचाच अर्थ भारताने शेती क्षेत्राच्या विकासात चीनला मागे टाकले. असे नीती आयोगाने ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात ही उल्लेखनीय बाब नमूद केली आहे.

या कालावधीत जगातील शेती क्षेत्राची वाढ मंदावली होती. पण भारतातील शेती क्षेत्र आघाडीवर राहिले, असे उदयोन्मुख भारताच्या आकांक्षा पूर्ण करण्यात शेती अहवालात म्हटले आहे. नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद यांनी हा अहवाल प्रसिद्ध केला होता. २०१४-१५ ते २०२३-२४ या कालावधीत शेती उत्पादकांच्या उत्पन्नात वार्षिक १०.११ टक्क्यांनी वाढ झाल्याचा दावा अहवालात केला आहे. ही वाढ उत्पादन क्षेत्र आणि एकूण अर्थव्यवस्थेच्या तुलनेत अधिक आहे. दहा वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्नही १२६ टक्क्यांनी वाढले. तर २०१५-१६ आणि २०२२-२३ दरम्यानच्या काळात उत्पादकांचे उत्पन्न १०८ टक्क्यांनी वाढल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. विकसित देशांच्या पातळीपर्यंत दरडोई उत्पन्न वाढवणे आणि समावेशक विकास, म्हणजेच सबका विकास सुनिश्चित करणे, या दोन प्रमुख आधारस्तंभांवर २०४७ पर्यंत विकसित भारत ध्येय साध्य करणे अवलंबून आहे. देशाच्या परिवर्तनात शेती क्षेत्राने मध्यवर्ती भूमिका बजावली पाहिजे. कारण सध्याच्या दरानुसार देशातील उत्पन्नात शेती क्षेत्राचा १९.७३ टक्के वाटा आहे. देशाच्या एकूण मनुष्यबळांपैकी ४६ टक्के लोकांना शेती क्षेत्रातूनच रोजगार मिळतो, असेही त्यात नमूद केले आहे.

देशातील २०१४-१५ ते २०२४-२५ हा कालावधी भारताच्या शेती क्षेत्राच्या इतिहासातील सर्वोच्च वाढीचा टप्पा राहिला. ज्यामुळे या क्षेत्राचा मजबूत आणि शाश्वत विस्तार झाल्याचे चंद यांनी म्हटले आहे. ही वाढ मागणीवर आधारित आहे. उच्च मूल्य असलेली पिके आणि संलग्न क्षेत्रांकडे कल वाढला आहे. हे शेतीमधील संरचनात्मक परिवर्तन दर्शवते. ''याच कालवधीत, हवामानविषयक आणि जागतिक स्तरावर आर्थिक अनिश्चितता असताना शेतीने वाढीव स्थिरता आणि तग धरण्याची क्षमता दर्शविली. त्याचबरोबर, या क्षेत्राने वेगाने वाढणाऱ्या मनुष्यबळाला, विशेषतः महिलांना सामावून घेतले. यातून त्याचे सातत्यपूर्ण सामाजिक-आर्थिक महत्त्व अधोरेखित होते, असा उल्लेख अहवालात करण्यात आला आहे. हे कल असे सूचित करतात की विकसित भारत २०४७'' चे ध्येय साकार करण्यात शाश्वत शेती प्रगती महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास चंद यांनी व्यक्त केला आहे. या अहवालानुसार, २००४-०५ आणि २०१४-१५ नंतर शेती आणि संलग्न क्षेत्राच्या सकल मूल्यवर्धनात वाढ झाली. ''शेती क्षेत्राच्या उत्पन्नातील या वेगवाढीमुळे २०१५१६ ते २०२४२५ या दरम्यान वार्षिक वाढीचा दर ऐतिहासिकदृष्ट्या उच्चांकी ४.४५ टक्क्यांपर्यंत गेला. १९५०५१ पासून आजपर्यंतच्या कोणत्याही दशकात देशाच्या शेती क्षेत्राने एवढी उच्चांकी वाढ साध्य केलेली नाही,'' असेही नीती आयोगाच्या अहवालातून सांगण्यात आले आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या देशनिहाय जीडीपीच्या आकडेवारीनुसार, २००६-२०१५ दरम्यानच्या कालावधीत भारतातील शेती क्षेत्राच्या वाढीचा दर सरासरी ३ टक्के राहिला, जो जागतिक शेती क्षेत्रातील वाढीइतकाच होता. त्यापुढील दशकात, म्हणजेच २०१५ ते २०२४ दरम्यान जागतिक स्तरावर शेती क्षेत्रातील वाढ मंदावली. पण भारताचे शेती क्षेत्र ४.४२ टक्के दराने वाढले. या वाढीसह भारताने चीनलाही मागे टाकले. ज्याचा विकास दर ४.१ टक्क्यांपर्यंत खाली आला.

# पपई पिकावरील रोग आणि त्यावरील सोपे उपचार



फळबागांचा विचार करता पपई हे शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळवून देणारं ठरतं पपईची लागवड देशभरात सर्वत्र केली जाते कोणत्याही प्रकारच्या मातीत पपईची बाग लावणं शक्य असतं कमी पाण्यावर हे पीक घेता येतं एकंदर गुंतवणूकही कमी लागत असताना फायदा अधिक होतं मात्र पपईची लागवड करायची असेल तर पिकाची देखभाल वारंवार करावे लागते पपईचे फळ चविष्ट असून त्यात अनेक औषधी गुणधर्म असल्यामुळे योग्य बाजारपेठ शोधल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते.

माहू : रोपांमधील रस शोषून हा रोग फळ कमकुवत बनवतो फळांना या रोगापासून वाचवण्यासाठी कडू लिंबाचा काढा किंवा गोमूत्राचा शिंपण करणं फायदेशीर ठरतं. लाल कोळी : लाल कोळी ही कीड पपईच्या पिकावर पडू शकते. ती पानांमधील रस शोषून रोपांना कमकुवत बनते या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यास कीड फळांमधील रस शोषून लागते. या किडीचा बंदोबस्त करण्यासाठी ही कडुनिंबाचा काढा किंवा गोमूत्रात शिंपण फायदेशीर ठरतं. कालर राट : कालर राट नावाचा रोग पिथीयम इफेनिदर्मेटम नावाच्या बुरशीमुळे पिकावर पडतो. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे जमिनीपासून जवळ खोडावर डाग पडू लागतात आणि खोड सडू लागते. काही दिवसानंतर झाड कोसळून पडते. या रोगापासून बचावासाठी एरंडाचे तेल तसेच कडुनिंबाचे खत देणे उपयुक्त ठरते. याशिवाय गोमूत्र आणि कडुनिंबाच्या काढण्याचाही चांगला उपयोग होतो. आरद्रगलन : या नावाचा रोग रोपवाटिकेत रोपे असतानाच होऊ शकतो. हा एक गंभीर बुरशीजन्य आजार असून या आरोपामुळे जमिनीलगतच रोप कुजण्यास सुरुवात होते आणि नंतर रोप माना टाकतात. या रोगाच्या नायनाटासाठी केरोसिन, तेल, गोमूत्र, कडुनिंबाचे तेल आणि कढ्याचा वापर करून रोपं उपचारित केली जातात. मगच त्याचे रोपण करण्यात येते. रोपवाटिकेच्या मातीत कडुनिंबाचे खत आणि एरंडाचे तेल मिसळून मगच रोपे तयार केल्यास हा रोग होत नाही.

मॉजेक : हा एक विषाणूजन्य रोग असून पपईच्या भारतातील जवळजवळ सर्व प्रजातींवर तो रोग पडू शकतो. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे पाने निस्तेज आणि देठही लहान होतात. परिणामी फळे कमी लागतात. या रोगाच्या नायनाटासाठी कडुनिंबाचा काढा आणि गोमुत्राचा शिडकावा १० ते १५ दिवसांच्या अंतराने केल्या जातो.

# थारपारकर जातीची गाय अधिक दूध देण्यास सक्षम

गेल्या चार वर्षांत भारतातील दुग्ध व्यवसाय झपाट्याने वाढला आहे. तर जागतिक दुग्ध उत्पादनात केवळ १.७ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तर दूध उत्पादनात जागतिक स्तरावर केवळ १.७ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. तज्ज्ञांनी थारपारकर ही त्याच्या विशेष गुणांमुळे दुग्ध व्यवसायासाठी अतिशय उपयुक्त प्राणी असल्याचे म्हटले आहे. वास्तविक, या जातीच्या गायीमध्ये ४५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात जास्त दूध देण्याची क्षमता असते. प्रतिकूल परिस्थितीतही त्याच्या उत्पादन कार्यक्षमतेत काही फरक पडत नाही. जिथे वाढत्या तापमानासह, इतर जातीच्या गाई आणि जनावरांचे दूध उत्पादन २० ते ३० टक्के कमी होते. त्याच वेळी, ही जाती प्रतिकूल परिस्थितीतही अधिक दूध देण्यास सक्षम आहे. त्याची उत्पादनक्षमता इतर जातींपेक्षा चांगली आहे. ती आयुष्यभर १५ मुलांना जन्म देऊ शकते, तर इतर जातींच्या गायी ५ ते १० मुलांना जन्म देऊ शकतात. उष्ण आणि कोरडे हवामान सहन करण्यास सक्षम, या जातीचे आयुष्य २५ ते २८ वर्षे आहे.

या राज्यात थारपारकर आढळतात : ही जात मूळ राजस्थान राज्यातील आहे, ती येथे बाडमेर, जैसलमेर, जोधपूर, जालौन आणि सिरोही भागात आढळते. वास्तविक राजस्थानचा हा वाळवंट प्रदेश आहे, तो थार वाळवंट म्हणून ओळखला जातो. यामुळेच गायीच्या जातीला थारपारकर असे नाव पडले. थारमध्ये आढळणाऱ्या गायींना थारपारकर म्हणतात. राजस्थानमध्ये याला मालानी या नावानेही ओळखले जाते. राजस्थान व्यतिरिक्त, देशाच्या विविध भागांमध्ये त्याचे संगोपन केले जाऊ शकते. पुण्याचे क्लब ऑफ वृंदावन मार्फतही गेल्या ५ वर्षांपासून थारपारकरांचे अनुसरण करत आहेत. त्याच्या क्लबमध्ये या जातीच्या १०० पेक्षा जास्त गायी आहेत. ज्यामध्ये अनेक गायी एकावेळी १६ ते १८ लिटर दूध देतात.

प्रतिकूल परिस्थितीत टिकून रहाते : राजस्थानचे थार वाळवंट एक उष्ण क्षेत्र आहे, येथील तापमान ५२ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदवले गेले आहे. हिवाळ्यात तापमान शून्य अंशांवर पोहोचते. अशा परिस्थितीत या जातीची गाय उच्च व कमी तापमानाचा सामना करण्यास सक्षम आहे. राजस्थानच्या उष्ण हवामानात टिकून राहण्यास सक्षम, थारपारकर इतर प्रांतांमध्ये सहजपणे पाळले जाऊ शकते. थारपारकर गायीची ओळख : थारपारकर पांढरा आणि जाड डोळ्यांचा आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. देशी जातीची गाय दिसायला सुंदर आहे, पण या जातीची स्वतःची वेगळी ओळख आहे. जरी ते दिसायला पांढरे असले तरी हिवाळ्यात त्याच्या शरीरावर काळे केस वाढत असतात. थारपारकरचे डोके मध्यम आकाराचे असते आहे, कपाळ रुंद आहे आणि कपाळ उंच असते. या गायींची उंची सहिवाल आणि राठी जातीच्या गायींपेक्षा किंचित जास्त असते.






## जागतिक दिवस

### राष्ट्रीय सड़क सुरक्षा सप्ताहाला सुरुवात

### महत्वाच्या घटना

१६१३ : मुघल सम्राट जहागीर ने पहिल्यांदा इस्ट इंडिया कंपनी ला सुरत येथे कारखाना उभारण्यास परवानगी दिली.
१७८७ : विल्यम हर्षेल याने 'टिटानिया' या युरेनसच्या सर्वात मोठ्या चंद्राचा शोध लावला. त्याच दिवशी त्याने 'ओबेरॉन' या युरेनसच्या दुसर्या मोठ्या चंद्राचाही शोध लावला.
१९२२ : मधुमेहावर उपचार करण्यासाठी प्रथमच इन्सुलिनचा वापर करण्यात आला.
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी कुआलालंपूर जिंकले
१९६६ : गुलजारीलाल नंदा यांनी भारताचे हंगामी पंतप्रधान म्हणून कार्यभार स्वीकारला.
१९७२ : पूर्व पाकिस्तानचे बांगला देश असे नामकरण करण्यात आले.
१९८० : बुद्धिबळाच्या खेळात नायजेल शॉर्ट वयाच्या १४ व्या वर्षी जगातील सर्वात लहान ईंटरनॅशनल मास्टर झाला.
१९९९ : 'कमाल जमीनधारणा कायदा' रद्द करणारा वटहुकूम केंद्र सरकारकडून जारी
२००० : छत्तीसगड उच्च न्यायालयाची स्थापना
२००१ : एस. पी. भरुचा यांनी भारताचे ३० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२००९ : स्लमडॉग मिलियनर या चित्रपटाला ६६ वा. गोल्डन ग्लोब अवार्ड मिळाला.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : जॉन ए. मॅकडोनाल्ड कॅनडाचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: ६ जून १८९१)
१८५८ : श्रीधर पाठक हिन्दी कवी, लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिन्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९२६)
१८५९ : लॉर्ड कर्झन ब्रिटिश मुत्सद्दी आणि भारताचे व्हॉइसराय (मृत्यू: २० मार्च १९२५)
१८९८ : ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांचा जन्म.
१९२८ : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (जन्म: २ जून १८४०)
१९४४ : शिबू सोरेन झारखंडचे ७ वे मुख्यमंत्री आणि खासदार आशा खाडिलकरआशा खाडिलकर
१९५४ : बाल मजुरांच्या विरुद्ध आवाज उचलणारे आणिनोबेल पारितोषिकविजेते कैलास सत्यार्थी यांचा जन्म.
१९५५ : आशा खाडिलकर उपशास्त्रीय व नाट्यसंगीत गायिका
१९६६ : स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांचे ताश्कंद येथे निधन झाले त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाने गौरविण्यात आले होते. (जन्म: २ आक्टोबर १९०४)
१९७३ : क्रिकेटपटू खेळाडू द. ग्रेट इंडियन वॉल राहुल द्रविड यांचा जन्म.
१९८३ : घनश्यामदास बिर्ला उद्योगपती व शिक्षण महर्षी (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भबतोष दत्ता अर्थतज्ञ (जन्म: २१ फेब्रुवारी १९११)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२८ : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (जन्म: २ जून १८४०)
१९५४ : सर जॉन सायमन स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला राजकीय सुधारणा देण्यासाठी नेमलेल्या 'सायमन कमिशन' या आयोगाचे अध्यक्ष. क्लेमंट ॲटली हे देखील या आयोगाचे एक सदस्य होते, जे पुढे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. (जन्म: २८ फेब्रुवारी १८७३)
१९६२ : भारतीय कम्युनिस्ट पार्टी चे नेता अजय घोष यांचे निधन.
१९६६ : स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांचे ताश्कंद येथे निधन झाले. त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाने गौरविण्यात आले होते. (जन्म: २ आक्टोबर १९०४)
१९८३ : घनश्यामदास बिर्ला उद्योगपती व शिक्षण महर्षी (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९० : भारतीय संगीतकार राम चतुर मलिक यांचे निधन.
१९९७ : भबतोष दत्ता अर्थतज्ञ (जन्म: २१ फेब्रुवारी १९११)
२००८ : य. दि. फडके लेखक व इतिहाससंशोधक (जन्म: ३ जानेवारी १९३१)
२००८ : सर एडमंड हिलरी माउंट एव्हरेस्टवर सर्वप्रथम चढाई करणारे न्यूझीलंडचे गिर्यारोहक (जन्म: २० जुलै १९१९)

# उन्हाळ्यात फळबागा जगवण्याच्या पद्धती



राज्यात गेल्या वर्षी एप्रिल-मे महिन्यात सर्वसाधारणपणे ४२ ते ४७ अंश सेल्सिअस तापमान नोंदविले गेले आहे. विशेतः अवर्षणप्रवण क्षेत्रात पाण्याचे मोठ्या दुर्भिक्ष असल्याने फळबागा व जित्राब जगवायची कशी असा प्रश्न शेतकऱ्यांना सातत्याने पडतो आहे. या काळात सूर्यप्रकाश, गरम वारे, कोरडी हवा याचा विपरीत परिणाम नवीन लावलेल्या फळझाडांवर तसेच फळे देणाऱ्या झाडांवर होत असतो. यामुळे मुख्यत्वे कोवळी फुट करपणे, खोड तडकणे, फळगळ होणे, फळांचा आकार लहान होणे, सर्व पाने ,फळे गळून झाडे वाळून जाणे, झाडांची वाढ थांबणे आणि शेवटी झाड मरणे असे प्रकार होतात याकरिता पाण्याचा आणि उपलब्ध साधनांचा कार्यक्षम वापर उन्हापासून बचाव करण्या करिता करावयास हवा.

पाण्याचा कार्यक्षम वापर :उन्हाळ्यामध्ये शक्यतो ठिबक सिंचन किंवा भूमिगत सिंचन पद्धतीने थेट फळझाडांच्या मुळापाशी गरजेनुसार पाणी द्यावे. या पद्धती दुष्काळी क्षेत्रामधे किंवा पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्राकरिता अत्यंत फायदेशीर आहेत.या पद्धतीत इतर प्रचलित पद्धतीपेक्षा ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते व उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ मिळू शकते. या पद्धतीमुळे झाडांच्या गरजेनुसार पाणी मोजून देता येते व पाण्याचा अपव्यय होत नाही. पाण्याबरोबर खते देता येतात,त्यामुळे खताच्या खर्चात बचत होते. फळबागेस/पिकास पाणी सकाळी अथवा रात्री दिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होतो.पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्रात एक आड एक सरीने पाणी द्यावे. तसेच पाणी देण्याच्या पाळीत (अंतरात) वाढ करावी. उदाहणार्थ एखाद्या बागेस १० दिवसाच्या अंतराने पाणी देत असाल तर पुढील पाणी १२ दिवसाने,त्यापुढील पाणी १५ दिवसाने अशा प्रकारे जमिनीचा मगदूर,तापमान आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घ्यावी.मडका सिंचन पद्धत : कमी क्षेत्रातील व जास्त अंतरावरील फळझाडांना ही पाणी देण्याची पद्धत आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. या पद्धतीत लहान झाडांना साधारणता दोन ते तीन वर्षाकरिता ५ ते ७ लिटर पाणी बसणारी लहान मडकी वापरावीत व जास्त वयाच्या मोठ्या झाडांकरिता १० ते १५ लिटर पाणी बसेल अशी मडकी वापरावीत. मडकी शक्यतो जादा छिद्रांकीत किंवा आढीत कमी भाजलेली असावीत. पक्क्या भाजलेल्या मडक्याच्या बुडाकडील बाजूस लहानसे छिद्र पाडावे व त्यामध्ये कापडाची चिंधी किंवा नारळाची शेंडी बसवावी. प्रत्येक झाडास दोन मडकी जमिनीत खड्डा खोडून बसवावीत व त्यामध्ये संध्याकाळी पाणी भरून ठेवावे. मडके पाण्याने भरल्यानंतर त्यावर झाकणी किंवा लाकडी फळी ठेवावी.त्यामुळे मडक्यातील पाणी बाष्पीभवनाने वाया जाणार नाही.या पद्धतीमुळे ७०- ७५ टक्के पाण्याची बचत होते.

आच्छादनांचा वापर करणे : उन्हाळ्यात बाष्पीभवनामुळे जमिनीतून पाण्याचे अधिक उत्सर्जन होते. आच्छादनांचा वापर केल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो. त्यामुळे जमिनीतील ओलावा टिकवून राहण्यास मदत होते.आच्छादनाकरिता पालापाचोळा, वाळलेले गवत, लाकडी भूसा, उसाचे पाचट, गव्हाचे काड, भाताचे तुस अशा सेंद्रिय संसाधनांचा वापर करावा. सेंद्रिय आच्छादनाची जाडी १२ ते १५ से.मी असावी. सेंद्रिय स्वरूपाचे आच्छादने वापरल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. सध्या आच्छादनासाठी पॉलिथीन फिल्मचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. आच्छादनामुळे सूर्यप्रकाश न मिळाल्यामुळे तणांची वाढ होत नाही,तसेच जमिनीचे तापमान नियंत्रित राहते.जमिनीत उपयुक्त जीवाणूंची वाढ होण्यास मदत होते.सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन असेल तर कालांतराने कुजून त्यापासून उत्कृष्ट सेंद्रिय खत मिळते. आच्छादनांमुळे जमिनीची धूप कमी होते तसेच जमिनीस भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते. आच्छादनामुळे दिलेल्या खताचा जास्त कार्यक्षमरित्या उपयोग करून घेता येतो. आच्छादने वापरण्यापूर्वी जमिनीवर कार्बारील्? भुकटी टाकून घ्यावी म्हणजे वाळवीचा प्रादुर्भाव होणार नाही.आच्छादनामुळे उन्हाळ्यात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालावधी/अंतर वाढविता येतो. आच्छादनांमुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनातही वाढ होते.

बाष्परोधकाचा वापर : फळझाडांनी जमिनीमधून शोषलेल्या एकूण पाण्यापैकी ९५ टक्के पाणी वनस्पती पर्णोत्सर्जनाद्वारे हवेत सोडतात. हे वाया जाणारे पाणी बाष्परोधकाचा वापर करून अडविता येते.बाष्परोधके हि दोन प्रकारची असतात. पर्ण्ररंध्रेबंद करणारी उदा. फिनील मरक्यूरी ॲसिटेट( ), ॲबसिसिक ॲसिड व पानावर पातळ थर तयार करणारी उदा. केओलीन,सिलिकॉन ऑईल,मेंण इत्यादी. उन्हाळ्यातील पाणीटंचाईस तोंड देण्यासाठी बाष्पच्छादनाबरोबर, बाष्परोधकाचा वापर केल्यास पाण्याची बचत होते. उन्हाळ्यात ६ ते ८ टक्के (६०० ते ८०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) तीव्रतेचे केओलीन फवारे २१ दिवसाच्या अंतराने किमान २ ते ३ वेळा करावेत किंवा पी.एम ए (फिनील मरक्यूरी ॲसिटेट) या बाष्परोधकाचे ८०० मिलीग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# महानगरपालिका निवडणूक मतदान अगोदरच कचऱ्यात आढळली आधार व मतदान कार्ड

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणूक १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून त्या अगोदरच जालना शहरात मतदान कार्ड व आधार कार्ड आढळल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आचारसंहिता कक्षाकडून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे अशी कृत्य घडल्यास कोणाचेही विचार केल्या जाणार नाही तात्काळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल असा इसारा निवडणूक विभागाकडून देण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्तांच्या आदेशानुसार भरारी पथकाची धडक कारवाई करण्यात आली. लोकप्रतिनिधित्व अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत एफआयआर नोंद करण्यात आला. जालना शहर महानगरपालिका निवडणूक पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू असतानाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील सावरकर चौक, सिंधी बाजार भागात कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदान ओळखपत्रे बेवारस अवस्थेत आढळल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची निवडणूक प्रशासनाने गंभीर दखल घेत संबधितांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा



दाखल केला आहे.

दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी आचारसंहिता कक्षाकडे सावरकर चौक परिसरात महत्त्वपूर्ण शासकीय ओळखपत्रे कचऱ्यात टाकण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली होती. अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने भरारी पथकास घटनास्थळाची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. भरारी पथकाचे प्रमुख श्री. डी. एन. हिवराळे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, तक्रारीत तथ्य असल्याचे निष्पन्न झाले. अतिरिक्त आयुक्तांच्या लेखी आदेशानुसार (जा.क्र. १११), पथक प्रमुख श्री. हिवराळे यांनी पोलीस प्रशासनाकडे रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी खालील कलमान्वये गुन्हा ( . ००२६/२०२६) नोंदवला आहे: भारतीय न्याय संहिता, २०२३ - कलम २२३ लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५०, १९५१ व १९८९ - कलम १२३ आचारसंहिता नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सांगितले की, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कागदपत्रे किंवा मतदारांच्या ओळखपत्रांबाबत निष्काळजीपणा करणे किंवा त्यांचा गैरवापर करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रामकिसन पांडुरंग वाघमारे करत आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणा अशा प्रकारच्या प्रत्येक तक्रारीवर २४ तासांच्या आत कार्यवाही करत आहे.

## भास्कर आबा दानवे यांच्या झंजावाती प्रचाराने विरोधक हादरले



जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १ मध्ये भाजपाचा जोरदार प्रचार सुरू असून, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या झंजावाती प्रचारामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत.

प्रभाग क्र. १ मध्ये आतापर्यंत झालेल्या भरीव विकासकामांच्या जोरावर भाजपाचे पाचही उमेदवार निश्चितपणे विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करत, जालना शहराचा महापौर भाजपचा करण्यासाठी व प्रभागातील अपूर्ण राहिलेली विकासकामे पूर्ण करण्यासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन भास्कर आबा दानवे यांनी मतदारांशी संवाद साधताना केले.

यावेळी त्यांनी जालना शहरातील इतर प्रभागांमध्येही भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधला. केंद्र व राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे जालना महानगरपालिकेवर भाजपची सत्ता आणून शहराचा चेहरामोहरा बदलण्याची हीच योग्य संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी प्रभाग क्र. १ मधील भाजपाचे उमेदवार भास्कर आबा दानवे, कल्याण भदनेकर, ज्योती सले, सुशीला दानवे, पद्मा मानधनी यांच्यासह अमोल कारंजेकर, सुभाष सले, कपिल दहेकर, नारायण पवार, गंभीर पडूळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंदूरीच्या कार्यक्रमात गोळीबार; एकाचा मृत्यू

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील चांदा येथील एका वस्तीवर कंदुरी कार्यक्रमाच्यावेळी झालेल्या वादातून गोळीबार झाला. त्यात शाहिद शेख याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने चांदा परिसर हादरला आहे. आरोपी पसार झाले असून पोलिस त्यांचा कसोसीने शोध घेत आहेत.

काल ११ जानेवारी २०२५ रोजी चांदा शिवारात सुरज लतीफ शेख याच्या चारी क्रमांक सहा जवळील वस्तीवर कंदुरीचा कार्यक्रम असल्यामुळे यातील मयत इसम शाहिद राज महंमद शेख (वय २३)हा सदर कार्यक्रमात बोकड कापण्यासाठी गेलेला होता.



या ठिकाणी सायंकाळी ४.४५ ते ७ वाजण्याच्या सुमारास मयत शाहिद शेख तसेच सुरज लतीफ शेख व अक्षय जाधव यांच्यात वाद झाले. नंतर हे वाद इतके विकोपाला गेले की आरोपींनी अग्निशस्त्रातून फायर करून शाहिद राजमहंमद शेख याचा खून केला आहे, अशी माहिती अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.मृतदेह पोस्टमार्टमसाठी अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवण्यात आला होता. या घटनेतील आरोपी घटनेनंतर पसार झाले. शोध घेण्यासाठी पथक रवाना करण्यात आले आहे. रात्री गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते. दरम्यान, घटनेची माहिती कळताच शनि शिंगणापूर येथील पोलीस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलिस अधिक्षक सोमनाथ वाघचोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. तसेच आरोपींना पकडण्याच्या सूचना केल्या. या घटनेने चांदा आणि परिसरात गावठी कट्टे असल्याच्या संशयाला बळकटी मिळत आहे. पोलिसांनी गावठी कट्ट्यांचा शोध लावून दहशत करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातून होत आहे.

# भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करा-आ. लोणीकर



जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीकडून प्रचाराला वेग आला आहे. सेवा, सुरक्षा, विकास या त्रिसूत्रीवर आधारित शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी ''कमळ'' या निवडणूक चिन्हासमोरील बटण दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, असे आवाहन भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते प्रभाग क्र. १ भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

जालना शहराच्या विकासासाठी सक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार भाजपने केला असून नागरिकांना मूलभूत सुविधा, सुरक्षितता आणि शाश्वत विकास देण्यासाठी पक्ष कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. ''एक संधी भाजपाला'' देऊन शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदारांनी कमळ निशाणीला साथ द्यावी, असेही आ.बबनराव लोणीकर यांनी नमूद केले. या वेळी व्यासपिठावर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव आबा दानवे, युवानेते प्रतीक दानवे, भागवत बावणे, कपिल दहेकर, अमोल कारंजेकर, सुभाष सले, नारायण पवार, विष्णुपंत मोरे, महादेव बनसोडे यांची उपस्थिती होती.

भाजपच्या माध्यमातून जालना शहराला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा संकल्प असून, नागरिकांच्या सहभागातून सक्षम महानगरपालिका घडविण्याचा विश्वास याप्रसंगी आपल्या भाषणात भाजपा नेते, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केला.

दरम्यान, प्रभाग क्रमांक १ या प्रभागातून श्री. कल्याण जगदीश भदनेकर, सौ. ज्योती रवि सले, सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. पद्मा अजित मानधानी आणि श्री. भास्कर मुकुंदराव दानवे हे उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व उमेदवारांना ''कमळ'' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कुत्रे पकडण्याची टीम अंबड मध्ये दाखल



अंबड। प्रतिनिधी

गेल्या अनेक महिन्यांपासून अंबड शहर आणि परिसरामध्ये कुत्र्यांनी धुमाकूळ घातला होता रस्त्यावर माणसापेक्षा कुत्र्यांची संख्या अधिक आहे की काय? अशी शंका वाटू लागली होती. गल्लीबोळात आणि मुख्य रस्त्यावरही कुत्रे सर्वत्र हैदोस घालताना दिसत होते. अनेक वेळा लहान मुलांना लचके तोडून अत्यंत गंभीर घटना घडल्या हीच गंभीर बाब लक्षात घेऊन नगराध्यक्ष देवयानी केदार दादा कुलकर्णी व मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी शहरातील शेकडे मोकाट याचा बंदोबस्त करण्यासाठी एक टीम तयार करून त्या टीम मार्फत काही कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली तसेच काही कुत्र्यांचा बंदोबस्त केला यामुळे अंबड शहरात कुत्र्याची संख्या कमी झाल्याचे दिसून येत आहे.

कुत्र्यामुळे हैदोष हे अत्यंत चिंतेची बाब आहे अनेक लहान मुलांना आणि शाळकरी मुला मुलींना, सायकलवर किंवा पाय जाताना भीती निर्माण होत आहे. त्यामुळे पालक वर्ग ही मोठ्या चिंतेत दिसून येतो. याची दखल घेत प्रशासनाने कुत्रे पकडण्याची मोहीम राबवली असल्याची सूत्रांची माहिती असल्याने एकूणच पालक वर्गाचा ही जीव भांड्यात पडला आहे.ही मोहीम राबवून कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी समस्त ग्रामस्थ आणि नागरिकांमधून होत आहे. शहरांमधील विद्यार्थी आणि पालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न अंबड नगर परिषद च्या अध्यक्ष देवयानी केदार दादा कुलकर्णी. मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या वतीने सोडविण्यात आला.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

पाटोदा। प्रतिनिधी

दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी येथील वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो डॉ.बळीराम राख होते तर प्रमुख पाहुणे प्रतिद्ध कवी श्री बाळासाहेब नागरगोजे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री संत ज्ञानेश्वर व केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .




मंचावर उपप्राचार्य प्रा डॉ सतिष माऊलगे, उपप्राचार्य डॉ अभय क्षीरसागर , कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा अनिल जोगदंड होते.मंचावरील सर्व पाहुण्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी कु वेदिका शिंदे, मकराणी महंमद व कु. कोकाटे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे मा बाळासाहेब नागरगोजे म्हणाले की,'' विद्यार्थ्यांनी अभ्यासामध्ये जिद्द आणि चिकाटी ठेवणे गरजेचे आहे'' असा मोलाचा सल्ला दिला. याप्रसंगी उपप्राचार्य नामदेव चांगण यांनी ही मोलाचे मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ बळीराम राख यांनी '' अभ्यासामध्ये सातत्य ठेवल्यास यश तुमच्याच हातात आहे'' असे सांगत जड अंतःकरणाने विद्यार्थ्यांना निरोप दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा विठ्ठल शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ कल्याण घोडके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ आर पी पवार, प्रा भारत बोराडे, प्रा पिंटू रोडे, प्रा महेश देशमूख यांनी सहकार्य केले.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/६१७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १६/१०/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) संतोष सत्यनारायण लाहोटी सर्व्हे नं.-८० प्लॉट नं.७ नं.प.मि.नं.१८-११०-७ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच प्लॉट मधील भाग
पश्चिम : १५ मिटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण- सर्व्हे नं.८० मधील जमीन
उत्तरः ६ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# नगर अर्बन बँकेतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरण ; बँकेच्या 'त्या' संचालकांना दणका

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नगर अर्बन बँकेच्या थकबाकीदार कर्जदाराला नियमबाह्य सूट देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय जिल्हा न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत फेटाळून लावला आहे. या निर्णयामुळे नगर अर्बन बँकेतील आर्थिक गैरव्यवहारांबाबत भारतीय रिझर्व बँकेने व्यक्त केलेला अंदाज तंतोतंत खरा ठरल्याचा दावा नगर अर्बन बँक बचाव समितीचे प्रमुख राजेंद्र गांधी यांनी केला आहे. ते रविवारी (११ जानेवारी) आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी ॲड. अच्युत पिंगळे, डी. एम. कुलकर्णी उपस्थित होते. जिल्हा न्यायालयाच्या निर्णयामुळे नगर अर्बन बँकेतील दोषी संचालकांना निवडणुकीस अपात्र ठरविण्याची मागणी पुन्हा ऐरणीवर आली असून अन्यथा हेच संचालक पुन्हा सत्तेत येऊन बँक बंद पाडतील, हा भारतीय रिझर्व बँकेचा भीतीयुक्त अंदाज न्यायालयानेही अधोरेखित केल्याचे राजेंद्र गांधी यांनी स्पष्ट केले.

नगर अर्बन बँकेच्या संगमनेर शाखेतून अमित पंडित या कर्जदाराला नियमबाह्य पध्दतीने सुमारे ३३ कोटी रूपयांचे कर्ज देण्यात आले होते. व्याजासह ही थकबाकी ४५ कोटी रूपयांहून अधिक झाली होती.

ही फसवणूक लपविण्यासाठी तत्कालीन संचालक मंडळाने कोणताही कायदेशीर अधिकार नसताना थकबाकीदाराकडून फक्त १६ कोटी रूपये घेऊन कर्ज खाते बंद करण्याचा ठराव मंजूर केला व कर्जदाराची मालमत्ता सोडून देण्यात आली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भारतीय रिझर्व बँकेने ४ ऑक्टोबर २०२३ रोजी नगर अर्बन बँकेचा परवाना रद्द करून बँक बंद केली होती. दरम्यान, या प्रकरणातील संशयित आरोपी कर्जदार अमित पंडित याने न्यायालयात अर्ज दाखल करून संचालक मंडळाच्या ठरावानुसार आपण १६ कोटी रूपयांची परतफेड केली असून आपले नाव आरोपींच्या यादीतून वगळावे, अशी मागणी केली होती. या अर्जावर सुनावणीदरम्यान फिर्यादी राजेंद्र गांधी व ठेवीदारांतर्फे ॲड. अच्युत पिंगळे, बँकेच्या अवसायकांतर्फे ॲड. पवार, तर सरकार पक्षातर्फे ॲड. मंगेश दिवाणे यांनी जोरदार युक्तिवाद करत संचालक मंडळ व कर्जदारातील संगनमत उघड केले.

सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर जिल्हा न्यायाधीश एम. एच. शेख यांनी संचालक मंडळाचा थकबाकीदाराला सूट देण्याचा ठराव बेकायदेशीर असल्याचे ठामपणे नमूद करत, संशयित आरोपीकडे अद्यापही मोठी रक्कम येणे बाकी असून कर्ज खाते बंद झालेले नाही, असा स्पष्ट निकाल देत आरोपीचा अर्ज फेटाळून लावला. या ऐतिहासिक निकालामुळे नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना व सभासदांना मोठा दिलासा मिळाला असून, दोषी संचालकांवर कठोर कारवाई होण्यासाठी बँक बचाव समिती पोलिसांकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी व इतरांनी स्पष्ट केले आहे. या निकालानंतर तत्कालीन चेअरमन अशोक कटारिया, व्हा. चेअरमन दीप्ती सुवेंद्र गांधी व सदर ठरावाला मंजुरी देणाऱ्या संचालकांवर जबाबदारी निश्चित करून नव्याने तपास व कठोर कारवाई होणार का, तसेच २०२१ नंतरच्या संचालकांना आरोपी करण्यात येणार का, याबाबत पोलिसांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी राजेंद्र गांधी व इतरांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांची वंजारवाडीत मतदान जागृती रॅली

बीड। प्रतिनिधी

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाचे वतीने तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथे मतदान जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मतदान जागृती बाबत अनेक घोषणा यावेळी विद्यार्थ्यांनी दिल्या.आदर्श गाव वंजारवाडी येथील मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ही रॅली काढण्यात आली.

यावेळी मतदान जागृतीच्या घोषणांनी आदर्शगाव वंजारवाडीचा संपूर्ण परिसर दुमदुमला. स्वा. सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे उद्धाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ.उत्तम साळवे आणि मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. डी. नागरगोजे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच मा. वैजनाथ नाना तांदळे,राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. श्रीधर आघाव, प्रा. डॉ. विजय संबेटवाड, प्रा. डॉ. ज्योतिश्वर भालेराव, प्रा. डॉ. रघुनंदन घुगे, प्रा. संतोष वाघमारे, प्रा. नारायण शिंदे, प्रा. डॉ. गंगाधर उषमवार, प्रा. राजपाल जाधव, प्रा. राम गव्हाणे, प्रा.दीपा देशपांडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे एम.डी.आदींसह मातोश्री विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील सर्व नागरिक सहभागी झाले होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६



# धारदार शस्त्र बाळगणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## माळीवेस भागातून स्कॉर्पिओसह धारधार शस्त्र पोलिसांनी केले जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, त्यांच्यासोबत पोलिस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान, चालक फिरोज पठाण, असे रात्रग्रस्त करत असताना, माळी वेस चौक या ठिकाणी एक पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ नंबर एम एच १७ ५००७ ही संशयितरित्या उभी असताना दिसून आल्याने, गाडी मध्ये बसलेले इसमाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव संजय पांडुरंग बहिर वय २७ वर्ष



राहणार नवगन राजुरी तालुका जिल्हा बीड असे सांगितले, तो त्या ठिकाणी का थांबला त्याबाबत त्याला विचारणा केली असता त्यांनी उडवडीची उत्तरे दिल्याने संशय येऊन पोलीस उपनिरीक्षक नेवरे व त्यांच्यासोबत असलेल्या पोलीस अंमलदार इलियास शेख अफसर बागवान यांनी गाडीची तपासणी केल्या असता त्यांना गाडीच्या मधल्या शीटखाली एक लोखंडी पाती असलेले धारदार घातक कोयता मिळून आला.

पोलिसांनी लगेच सदर संशयीत आरोपीस ताब्यात घेऊन बीड शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून सदर आरोपीला अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून एक लोखंडी धातूचा धारदार घातक कोयता व एक पांढरा रंगाची स्कार्पिओ जप्त करण्यात आली आहे . पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता. त्याच्यावर यापूर्वी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन पिंपळनेर पोलीस स्टेशन शिवाजी नगर पोलीस स्टेशन या ठिकाणी त्याच्यावर खून करणे, कुणाचा प्रयत्न करणे, रात्रीची घर थोडी करणे, चोरी करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पोलीस निरीक्षक बल्लाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, पोलीस अमलदार इलियास शेख, अफसर बागवान, चालक फिरोज पठाण यांनी केली आहे पुढील तपास पोलीस हवालदार बबन जाधव हे करत आहेत.

# सोनेगाव येथील शेतकऱ्यांना पवनचक्की कंपनीकडून दमदाटी

## दलाल व गावगुंडांची दादागिरी वाढली शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय झाडांची सर्रास कत्तल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात विविध ठिकाणी पवनचक्की प्रकल्पांची कामे सुरू असून, या कामांच्या नावाखाली संबंधित कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर अन्याय व दडपशाही केली जात असल्याचा गंभीर आरोप सोनेगाव येथील शेतकऱ्यांनी केला आहे. पवनचक्की उभारणीसाठी रस्ते तयार करताना शेतकऱ्यांची कोणतीही लेखी अथवा तोंडी परवानगी न घेता शेतातील तसेच रस्त्यालगतची झाडे तोडली जात असल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सोनेगाव परिसरात सुरू असलेल्या पवनचक्कीच्या कामात कंपनीचे अधिकारी स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता प्रकल्प राबवत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. बोरी, बाभूळ, लिंब, पिंपळ, आंबा यांसारखी उपयुक्त व वर्षानुवर्षे जोपासलेली झाडे कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अमानुषपणे तोडण्यात येत आहेत. याबाबत जाब विचारण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना दमदाटी, धमकावणे व दडपशाहीचे प्रकार होत असल्याचेही समोर आले आहे. स्थानिक गुत्तेदार व काही हस्तकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर दहशत निर्माण केली जात असून, त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतात थेट नांगर फिरवून रस्ते तयार केले जात असल्याने शेतकरी पूर्णतः हतबल झाले आहेत. प्रशासन व वनविभाग याकडे जाणीवपूर्वक

▶▶ पान २ वर

# पोलीस कर्मचाऱ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

**लग्नाचे आमिष दाखवून एका २५ वर्षीय तरुणीवर वारंवार बलात्कार केल्याप्रकरणी पोलीस दलातील एका शिपायाविरुद्ध अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आष्टी तालुक्यातील एका गावची रहिवासी आहे. आरोपी पोलीस शिपाई हा पीडितेच्या घराशेजारीच वस्तीवर वास्तव्यास होता. ओळखीचा फायदा घेत त्याने पीडितेचे आई-वडील घरी नसताना किंवा संधी मिळेल तेव्हा आरोपीने पीडितेच्या घरी जाऊन तिच्याशी वारंवार शरीर संबंध ठेवले आणि तिला लग्नाचे स्वप्न दाखवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यानंतर, त्याने तिला लग्नाचे ठाम आश्वासन दिले. लग्नाचे आमिष दाखवून त्याने दीर्घकाळ पीडितेचे लैंगिक शोषण केले. दरम्यानच्या काळात

▶▶ पान २ वर

# अवैद्य वाळू उपसा करणाऱ्यावर तहसीलदार शेळके यांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील साक्षाळपिंप्री येथे सिंदफना नदीपात्रातून अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने धडक कारवाई करत दोन ट्रॅक्टरवर कार्यवाही केली आहे . ही कारवाई १२ जानेवारी रोजी पारगाव सिरस महसूल मंडळाच्या हद्दीत साक्षाळपिंपरी येथे करण्यात आली. पहिल्या घटनेत महसूल पथकाने अफसर शेख याचे ट्रॅक्टर अडवले असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले . सदर वाळू सिंदफना नदीपात्रातून चोरट्या पद्धतीने उपसा करून वाहतूक करण्यात येत होती.

▶▶ पान २ वर



# डॉ.बाबासाहेब शेंडगे यांना पितृशोक

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा येथील प्रसिद्ध दाताचे डॉ. बाबासाहेब शेंडगे यांचे वडील आयु रंगनाथ राणूजी शेंडगे वय ९५ यांचे ११ जानेवारी रविवार रोजी सायंकाळी ७ वाजता वाजता त्यांच्या कानडी घाट येथे राहत्या घरी वृद्धपकाळाने निधन झाले आहे त्यांचा अंत्यविधी कानडी घाट येथे स्मशानभूमीत १२ जानेवारी सोमवार रोजी सकाळी १० वाजता करण्यात आला त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे.

# शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढीवर भर द्यावा–अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यातील बोरगाव परिसराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमात २५ लाख रुपये ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण, प्रत्येकी १० लक्ष रुपयांच्या दोन अंगणवाड्यांचे भूमिपूजन, चौक सुशोभीकरण अंतर्गत १० लक्ष रुपयांच्या पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याहस्ते करण्यात आला. या विकास कामांचा फायदा सर्वसामान्यांना होणार असून शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब**



**करून एकरी उत्पादन वाढविण्यावर भर द्यावा असे प्रतिपादन यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले.**

गेवराई तालुक्यातील बोरगाव येथील विविध विकास कामांचे लोकार्पण व भुमिपूजन कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, ''बोरगाव परिसरात दर्जेदार विकासकामे सुरू असून याचा थेट फायदा सर्वसामान्य जनतेला होणार आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून एकरी उत्पन्न वाढवण्यावर भर द्यावा. शासन व लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.'' कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांनी ग्रामस्थांना संबोधित केले. यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदू काका गोरडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबासाहेब जाधव, गुलमेश्वर ॲग्रोचे चेअरमन पवन चव्हाण, सरपंच अंगद खरात, सरपंच विलास वाघमोडे, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी सुभाष बापू बोर्डे, सरपंच विश्वंभर सोनवणे, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी बळीराम खराद, विश्वंभर गोरडे, देविदास खराद, प्रल्हाद खराद, मदन बापू गोरडे, आत्माराम गवारे, बदाम गोरडे, दिगंबर गंगाधर, चंदू जाधव यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी वर्ग व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात अडीच वर्षांची चिमुकली कुमारी यशस्वी राहुल जाधव हिने केलेल्या सुंदर व आत्मविश्वासपूर्ण भाषणाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या विकासकामांसाठी राहुल जाधव, माजी सरपंच संदीप जाधव व अशोक जाधव यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी विविध विकासात्मक मागण्या मांडल्या असता, सन्माननीय साहेबांनी त्याबाबत सकारात्मक भूमिका घेत योग्य तो निर्णय लवकरच घेण्याचे आश्वासन दिले.

# महाजनवाडी–बीड ते अयोध्याधाम श्रीरामनाम रथयात्रा सोहळा प्रस्थान



बीड । प्रतिनिधी

**लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक, श्रीराम भक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या संकल्पनेतून,श्रीरामनवमी निमित्त व देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी महाजनवाडी – बीड ते श्री. क्षेत्र अयोध्याधाम नमो श्रीरामनाम रथयात्रा सोळा काल बीड येथून प्रस्थान झाला.**

आज भाजपा जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ॲड. सर्जेराव तांदळे, मा. नवनाथ अण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत या रथयात्रेचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मीराताई गांधले, रामदास बडे, सुंदर चव्हाण, मनोज काका पाटील, भूषण पवार, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, प्रमोद पुसरेकर, प्रीतताई कुकडेजा, कृष्णा तिडके, महादेव नागरगोजे, मनोज काका बांडे, घोलप मामा, भालचंद्र कुलकर्णी, राजेश चरखा यांच्यासह पदाधिकारी व श्रीराम भक्त मोठ्या संख्येने

▶▶ पान २ वर

# गंगावाडी येथील शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारीच्या वायरची चोरी

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी पिकाला पाणी देण्यासाठी ठिकठिकाणी मोटारी बसवल्या आहेत. या मोटारी आणि त्याचे वायर चोरण्याचे प्रकार गोदाकाठी वाढले. दिं.९ रोजी गंगावाडी येथील या गोदावरीच्या काठावरील शेतकऱ्यांच्या अंदाजे पन्नास मोटारींचे आसपास वायर अज्ञात चोरट्यांनी चोरले. वायर काढून त्याच ठिकाणी वायरची जाळून होळी केली त्यातील ताबा लंपास केले. गेवराई तालुक्यातील गोदाकाठावरील गंगावाडी ,यासह अन्य गावच्या शेतकऱ्यांनी नदीवर मोटारी बसवलेल्या आहेत.



# आ.प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगावात भव्य शिवकालीन शस्त्रप्रदर्शन


## भेटवस्तूंऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य आणण्याचे आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार आदरणीय प्रकाशदादा सुंदरराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव नगरीत प्रथमच भव्य स्वरूपात शिवकालीन ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, युद्धशस्त्रांचे दर्शन तसेच मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि तरुण पिढीला शौर्य, शिस्त व संस्कारांची प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा वाल्मिकी अर्बन कोऑप्रेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिलभाऊ नखाते उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम तुळजाभवानी मर्दानी खेळ, प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था,पुणे यांच्या माध्यमातून आयोजित

▶▶ पान २ वर



# राजेंद्र काशिद यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी



सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी दै. रिपोर्टरचे जाहिरात व्यवस्थापक राजेंद्र काशिद यांचे वडील बबनराव काशिद (वय ९६ वर्ष ) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम, मोंढा रोड येथे दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. स्व. बबनराव काशिद यांच्या पश्चात भाऊ, बहिण, मुले, मुलगी, जावाई, नातवंडे, पतरुंडे असा मोठा परिवार आहे. काशिद परिवाराच्या दु:खात दैनिक राज्यलोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# जमिनीची बनावट कागदपत्रे तयार करून एकाची फसवणूक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोरेवाडी येथील जमिनीचे बनावट साठेखत तयार करून एका सेवानिवृत्त नाबार्ड अधिकाऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणी कर्णमुर्ती गंगाधर साळवे आणि वैभव बाबाराव तरकसे यांच्यावर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी चंद्रकांत रंगनाथ मोरे यांची जमीन हडपण्याच्या उद्देशाने आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार केली आणि त्या आधारे दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. आरोपींनी १० लाख रुपये रोख दिल्याचे भासवून फिर्यादीची खोटी सही व मुद्रांकाचा वापर केला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र घुगे करत आहेत.

## आर.सी.बुक हरवले आहे

खंडाळा ते बीड प्रवासादरम्यान मारुती सुझुकी ब्रिझा टू डी आय – क्रमांक एमएच–२३ एआर–४४७७ या वाहनाचे आर.सी.बुक हरवले आहे. ज्या कोणास मिळून आल्यास खालील नंबर वर संपर्क करावा

:::संपर्क :::

**तुकाराम बाबुराव चौरे**

मो.नं. ९९२३३८९७७७,९४२२७४३५६८

# सोयाबीन, कापूस भाववाढ; शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश–राजेंद्र आमटे




## हा शेतकरी व शेतकरी पुत्रांच्या एकजुटीचा विजय

बीड । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापूस पिकाला रास्त भाव मिळावा, या मागणीसाठी शेतकरी पुत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला यश मिळाल्याने सोयाबीन व कापसाच्या दरात वाढ झाली असून, हा विजय शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्रांच्या एकजुटीचा असल्याचे प्रतिपादन शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केले.**

बीड येथील संत तुकाराम महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरू झालेला कापूस व सोयाबीन भाववाढ आंदोलन मिडीयाचा माध्यमातून महाराष्ट्राच्या विधिमंडळात व थेट शेतकऱ्यांना भाववाढ करण्यापर्यंत पोहचली आहे . कापूस व सोयाबीन दरवाढीसाठी बीड जिल्ह्यातील सुमारे ७० ते ८० गावांमध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाची माहिती शेतकऱ्यांसमोर मांडण्यात आली. एक क्विंटल कापसापासून ७०० ते ८०० मीटर कापड, ५० किलो सरकी पेंड तसेच ८ ते १० लिटर तेल तयार होते. या सर्व उत्पादनांतून व्यापारी एका क्विंटलमागे ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत नफा कमावतात, मात्र शेतकऱ्याला केवळ सुमारे ७ हजार रुपयेच दिले जातात, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच एका क्विंटल सोयाबीनपासून ७०० ते ८०० लिटर सोया दूध तयार होते. ऑनलाईन विक्री संकेतस्थळांवर सोया दुधाचा दर प्रतिलिटर सुमारे १२० रुपये असल्याने व्यापारी एका क्विंटल सोयाबीनमागे ७५ ते ८५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवतात, मात्र शेतकऱ्याला अत्यल्प दर दिला जातो, याबाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृतीनंतर शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना भाववाढ केल्याशिवाय कापूस न देण्याचा निर्णय घेतला, तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवर माल देणे तात्पुरते थांबवले. परिणामी बाजारात कापूस व सोयाबीनचा तुटवडा निर्माण झाला. शेतमाल उपलब्ध होत नसल्याने व्यापाऱ्यांना अखेर कापूस व सोयाबीनचे दर वाढवावे लागले. शेतकरी पुत्रांच्या लढतीमध्ये शासनाने कापूस आयातीवर व्यापाऱ्यांना कर सूट थांबल्यामुळे फायदा झाला आहे हा यशस्वी लढा शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या एकजुटीचा असल्याचे राजेंद्र आमटे यांनी सांगितले. या आंदोलनास माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, कुलदीप करपे, सुहास जायभाय, राजू गायके, बाळासाहेब मोरे पाटील, गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, दिनेश गुळवे, धनंजय मुळे, नयना भाकरे, हिराबाई कांबळे, अंकुश सातपुते, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, गणेश मस्के, संगमेश्वर आंधळकर, भास्कर खंडे, रामधन जमाले, दत्ता प्रभाळे, खाजाभाई पठाण, राहुल साळुंके, संतोष शिंदे, श्रीराम कोरडे, श्रीकांत गदळे, सुरेश गरड, अप्पा डाके, आप्पासाहेब महानोर, हनुमान घोडके आदींचा सक्रिय पाठिंबा लाभला.

### “ ‘शेतकरी जागृतीत’ मिडीयाचा सिंहाचा वाटा ; शेतकरी पुत्राने मानले आभार

प्रिंट मिडिया, इलेक्ट्रिक मिडिया, सोशियाल मिडिया यांनी शेतकऱ्यांना जागृत केले, भाववाढीचा शिवाय कापूस व सोयाबीन न विकण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला, बाजारात कापूस व सोयाबीन तुटवडा निर्माण झाला व्यापाऱ्यांना भाववाढ करावी लागली शेतकरी पुत्रांच्या वतीने केले सर्व मिडिया बांधवांचे आभार

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# यंदा बारामतीचे प्रदर्शन आठ दिवस!

## कृषक प्रदर्शन शनिवारपासून; ११ वर्षांची परंपरा जपली




बारामती । प्रतिनिधी

**बारामती ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्राचे यंदाचे कृषिप्रदर्शन कृषक २०२६ चे आयोजन केले असून १७ ते २४ जानेवारी या कालावधीत प्रदर्शन होणार आहे. यंदा कृषक चा कालावधी वाढला असून आठ दिवस प्रदर्शन भरवले जाणार आहे.कृषिक' हे जगातील सर्वात मोठे प्रात्यक्षिक आधारित कृषी प्रदर्शन यंदा आपल्या ११ व्या वर्षात पदार्पण करत आहे.**

१७० एकर प्रक्षेत्रावर प्रदर्शन भरणार असून दरवर्षी देशभरातून अडीच ते तीन लाख शेतकरी या प्रदर्शनाला भेट देतात. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते (दि.१७) रोजी उद्घाट्न होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, रोहित पवार यांची उदघाटनाला उपस्थिती असेल, अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे सीईओ निलेश नलावडे उपस्थित होते.

### “ एआयवर सुरू उसाची उत्सुकता

यंदाच्या कृषी प्रदर्शनात –ख तंत्रज्ञान आधारित सुरु उसाचे २०० टन तर खोडवा उसाचे १५० टनाचे प्रत्येशिक शेतकऱ्यांना पाहण्यास मिळणार आहे. शेतकऱ्यांना देश विदेशातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन ,निविष्ठांच्या माहितीचा खजिना, विविध पिकांचे प्रात्यक्षिके पाहण्याची संधी कृषकच्या माध्यमातून मिळणार आहे. प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र पवार यांनी केले आहे. आतापर्यंत २० लाख शेतकऱ्यांनी कृषिकला भेट दिल्याची नोंद आहे.

### “ विज्ञानाची जोड दिल्यास शेती समृद्ध

राजेंद्र पवार म्हणाले, केव्हीके बारामतीचा एआय ऊस शेती प्रकल्प दाखवितो की, परंपरेला विज्ञानाची जोड दिल्यास शेती समृद्ध, आधुनिक आणि टिकाऊ होऊ शकते. हा प्रकल्प केवळ तांत्रिक प्रयोग न राहता, भारताच्या कृषी भविष्याची दिशा ठरविण्यास आदर्श मॉडेल ठरत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील रचलेला हा एक नवा इतिहास उलगडून पाहण्याची संधी यंदा कृषिकच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले.

## शाळांच्या परिसरात तंबाखू विक्रीविरोधात व्यापक मोहीम; एकाच दिवशी अनेक ठिकाणी कारवाई

भोर । प्रतिनिधी

**भोर तालुक्यातील शाळा व शिक्षणसंस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर राजगड पोलीस स्टेशन यांच्या वतीने दि. १० रोजी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत व्यापक तपास मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शिंदेवाडी, ससेवाडी फाटा तसेच वेळू या गावांमध्ये एकाच दिवशी सलग कारवाई करून अनेक पानटपऱ्या, हॉटेल्स व किराणा दुकाने तपासण्यात आली.**

शिंदेवाडी गावच्या हद्दीत भारती विद्यापीठ शाळेच्या परिसरात तपासणी करत असताना संशयित आरोपी सागर साहेबराव शिंदे हा पानटपरी व्यवसायातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच परिसरात ससेवाडी फाटा येथे वेगवेगळ्या वेळेत केलेल्या कारवाईत निखील प्रकाश गोगावले तसेच लक्ष्मण बाळू गोगावले हे संशयित आरोपी शाळेजवळील परिसरात तंबाखू व सिगारेटची विक्री करताना आढळले. याच दिवशी वेळू गावच्या हद्दीत जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आणि आसपास तपासणी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत किराणा दुकान व इतर व्यवसायातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे सारिका पांगारे, सोनाली खुंटे, संतोष पांगारे तसेच देवा राम पटेल हे संशयित आरोपी पोलिसांच्या निदर्शनास आले. शाळेच्या अगदी जवळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिबंधित असलेल्या परिसरातच ही विक्री सुरू असल्याचे तपासात स्पष्ट झाले. या सर्व कारवायांमध्ये विविध प्रकारचे तंबाखू, सिगारेट, बिडी, पानमसाला आदी पदार्थ जप्त करण्यात आले. शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेता पोलिसांनी कोणतीही तडजोड न करता तात्काळ कारवाई केली. संपूर्ण मोहिमेची कायदेशीर प्रक्रिया पोलीस कॉन्स्टेबल गणेश साळुंके व अमोल शेडगे यांच्या फिर्यादीवरून पार पडली. प्रत्यक्ष कारवाईत पोलीस हवालदार मुंढे यांनी सक्रिय सहभाग घेतला, तर पुढील तपासाची जबाबदारी पोलीस हवालदार गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. ही संपूर्ण मोहीम प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. भविष्यातही भोर तालुक्यातील सर्व शाळा परिसरात नियमित तपासणी करून अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

## अन् उसाच्या शेतातून सचिन घायवळ निसटला, महिलेने टिप दिल्याचा पोलिसांना संशय

पुणे । प्रतिनिधी

**जामखेड तालुक्यातील एका गावामधील उसाच्या शेतात सचिन घायवळ लपून बसल्याची माहिती पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेला मिळाली होती. परंतू पोलिस तेथे पोहचल्याची चाहूल लागताच त्याने शेतातून पळ काढल्याचे समोर आले आहे. एका महिलेने सचिनला पोलिस आल्याची माहिती दिल्याचा संशय आहे. गेल्या आठवड्यात हा प्रकार घडला आहे.**

दरम्यान, सचिनला पळून जाण्यास मदत करणारी महिला देखील पोलिसांच्या रडावर आहे. तिला ताब्यात घेऊन पोलिस कसून चौकशी करणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. तिला ताब्यात घेण्याचे आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्याची माहिती आहेत. सचिन घायवळ हा गुंड निलेश घायवळचा मोठा भाऊ आहे. ४४ लाख ३६ हजार रुपयांची खंडणी उकळल्याच्या आरोपावरून गुंड निलेश घायवळ, त्याचा भाऊ सचिन घायवळ यांच्यासह तेरा जणांवर वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. कर्वेनगर, शिवणे भागातील एका नामवंत शाळेतील विद्यार्थ्यांना खाद्यपदार्थ, तसेच वाहतूक सेवा पुरविणाऱ्या एका खासगी कंपनीतील संचालक महिलेकडून ही खंडणी उकळण्यात आली होती. याप्रकणी, एका खासगी कंपनीतील ४० वर्षीय संचालक महिलेने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, बापू कदम, नीलेश घायवळ, सचिन घायवळ, पप्पू दळवी, अभि गोरडे, दीपक आमले, बाबू वीर, अमोल बंडगर, बाबू पिसाळ, अमोल लाखे, संदीप फाटक, बबलू गोळेकर आणि बबलू सुरवसे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढे पोलिसांनी सचिन घायवळ याच्यावर देखील महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केली. तेव्हापासून सचिन पुण्यातून फरार झाला आहे. पोलिस त्याचा शोध घेत होते. गेल्या आठवड्यात सचिन जामखेड तालुक्यातील एका गावातील शेतातील उसात



लपून बसला आहे. अशी माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथक त्याच्या मागावर जामखेड येथे धडकले. परंतू त्याच गावातील एका महिलेने सचिन याला पोलिस त्याला पकडण्याठी आल्याची माहिती दिली. त्यामुळे तो अलर्ट झाला. पोलिस त्याच्या जवळ पोहचलेच होते. परंतू त्या पुर्वीच त्याने तेथून पळ काढला. गुन्हे शाखेने आपला मोर्चा आता सचिन याला पोलिस आल्याची टिप देणाऱ्या महिलेकडे वळविला आहे. तिला ताब्यात घेऊन पोलिस तिची कसून चौकशी करणार असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे गुंड निलेश घायवळ आद्याप देखील विदेशात फरार आहे. तो ब्रिटनमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती आहे. कोथरुड गोळीबार प्रकरणात तो फरार असून, त्याच्यावर बनावट पासपोर्ट प्रकरणी देखील गुन्हा दाखल आहे. त्याच्या घरझडतीस काडतूसाचा बॉक्स आढळून आला होता. तर त्याच्या एका साथीदाराने देखील शस्त्र परवाना मिळविताना खोटी माहिती दिली होती. त्याने दोनशे काडतूसे शेतात फायर केली होती. पोलिसांनी त्याचा शस्त्र परवाना रद्द केला आहे. निलेश घायवळ याला न्यायालयाने फरारी घोषीत केले आहे. निलेशच्या मालमत्तेवर टाच आणण्याची कारवाई पोलिसांकडून करण्यात आली आहे. त्याच्या प्रत्यार्पनासाठी ब्रिटीश उच्चायुक्त कार्यालयाशी पुणे पोलिसांनी पत्रव्यावहार केला आहे.

## गजानन मारणेला महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ अन् १६ जानेवारीला पुण्यात येण्याची परवानगी

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यातील गुंड गजानन मारणेला महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ आणि १६ जानेवारीला पुण्यात येण्यासाठी उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. गजानन मारणेची पत्नी जयश्री मारणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाकडून कोथरूड भागातून निवडणूक लढवत आहे. मात्र विविध प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल असल्याने गजानन मारणेला पोलीसांनी पुणे जिल्ह्यात प्रवेश करण्यास बंदी घातली होती. या बंदीच्या विरोधात गजानन मारणेने मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. ती मान्य करताना उच्च न्यायालयाने गजानन मारणेला १५ आणि १६ जानेवारीला पुण्यात येण्यासाठी परवानगी दिली आहे. दोन**



**दिवसांसाठी जिल्हा बंदी उठवण्यात असल्याने गजानन मारणे निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहे.**

मोक्का गुन्ह्यात जामीन देताना पुणे शहरात येण्यास बंदी घालण्यात आलेला गँगस्टर गजा मारणे (ऋक्षरपरप चरीपश झींपश एश्रशलींळेप २०२६) याला आता महानगरपालिका निवडणुकीसाठी येता येणार आहे, गजा मारणे यांची पत्नी महापालिका निवडणुकीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उभी आहे. गजा मारणे सध्या त्याच्या मुळशीतील घरामध्ये वास्तव्यास आहे. तर मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निकटवर्तीय संगणक अभियंत्याला मारहाण केल्याप्रकरणात गजा मारणे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यात मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली. या प्रकरणात गजा मारणे याला महापालिका निवडणुकीपूर्वी जामीन मंजूर करण्यात आला होता. त्यात याला पुणे शहरात प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला आहे. पत्नी जयश्री मारणे ही निवडणुकीला उभी आहे. तिला प्रचारात मदत करण्यासाठी पुणे शहरात येऊ द्यावे अशी मागणी करणारा अर्ज गजा मारणे याच्या वतीने न्यायालयात करण्यात आला होता. त्याला पोलिसांनी विरोध केला होता. गजा मारणे याला शहरात प्रवेश दिला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे पोलिसांनी सांगितले त्यानंतर न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळून लावताना त्याला मतदानासाठी त्या दिवशी व न्यायालयातील तारखांना हजर राहण्यासाठी पुणे शहरात येण्यास सवलत दिली आहे. याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अर्ज करणार असल्याचे ॲड् विजयसिंह ठोंबरे यांनी सांगितले होते. त्यानुसार आता गुंड गजानन मारणेला महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ आणि १६ जानेवारीला पुण्यात येण्यासाठी उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

## बिबवेवाडी-शंकर महाराज मठ परिसराच्या विकासाला भाजपकडून गती

बिबवेवाडी । प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पुणे शहरातील पुण्यनगरी परिसरात जोरदार प्रचार मोहीम राबविण्यात आली. या प्रचार मोहिमेत राजेंद्र आबा शिळीमकर, मानसी मनोज देशपांडे, महेंद्र माणिकचंद सुंदेचा (मुथा) आणि तन्वी प्रशांत दिवेकर यांनी सक्रिय सहभाग घेत नागरिकांशी थेट संवाद साधत महायुतीच्या उमेदवारांच्या बाजूने वातावरण निर्मिती केली.**

या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी पुण्यनगरीतील भीमदीप वसाहत, तुळशीनगर आणि नवमित्र सोसायटी परिसरात घरोघरी भेटी देत मतदारांशी संवाद साधला. या वेळी भारतीय जनता पक्ष व महायुतीने आजवर



राबविलेल्या विकासात्मक कामांची माहिती देत आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या योजना, नागरी सुविधा, पायाभूत विकास, महिला व युवकांसाठीच्या योजना याबाबत नागरिकांना अवगत करण्यात आले. प्रचारादरम्यान नागरिकांनी आपल्या परिसरातील विविध समस्या मांडल्या. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक, सार्वजनिक सुरक्षेसह इतर मूलभूत सुविधांबाबत नागरिकांनी आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या. या सर्व समस्यांची दखल घेत योग्य तो पाठपुरावा करून त्या सोडविण्याचा निर्धार यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. जनतेशी थेट संवाद हाच लोकशाहीचा खरा आधार आहे, असे मत यावेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केले. या प्रचार मोहिमेला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक नागरिकांनी भाजप–महायुतीच्या उमेदवारांवर विश्वास व्यक्त करत आगामी निवडणुकीत त्यांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. कार्यकर्त्यांमध्येही मोठा उत्साह दिसून आला. या संपूर्ण प्रचार मोहिमेचा समारोप पुण्यनगरीतील भीमदीप वसाहत, तुळशीनगर येथील नवमित्र सोसायटीमध्ये करण्यात आला. समारोपप्रसंगी कार्यकर्त्यांनी महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. आगामी निवडणुकीत पुण्यनगरी परिसरातून महायुतीला भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, भाजप–महायुतीच्या प्रचाराला नवे बळ मिळाल्याचे दिसून येत आहे.


## हॉटेल जगदंबा गॅस स्फोट प्रकरणाने खळबळ; जखमींच्या उपचारांवर प्रश्नचिन्ह



दौंड । प्रतिनिधी

**दौंड–पाटस रस्त्यावरील हॉटेल जगदंबा येथे गिरिम गावच्या हद्दीत झालेल्या भीषण गॅस सिलिंडर स्फोटात १० जण गंभीर जखमी झाले. त्यापैकी ६ जणांची प्रकृती अत्यवस्थ असून, ते ७५ ते ८० टक्क्यांहून अधिक भाजलेले होते. या जखमींना तातडीने पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र, इतक्या गंभीर परिस्थितीतही ससून रुग्णालय प्रशासनाने नातेवाईकांकडून लेखी जबाबदारी घेऊन जखमींना त्यांच्या मूळ गावी हलवण्यास परवानगी दिली, ही बाब अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरत आहे.**

याबाबत दौंड पोलिसांकडे चौकशी केली असता, नातेवाईकांनी देखभाल करणारे कोणी नाही असे कारण देत स्वतःहून जखमींना घेऊन गेल्याचे सांगण्यात आले. परंतु एवढ्या गंभीर जखमी रुग्णांना नातेवाईकांच्या सांगण्यावरून सोडणे वैद्यकीय व कायदेशीरदृष्ट्या योग्य होते का? असा प्रश्न दौंड शहरात उपस्थित केला जात आहे. वास्तविक पाहता, यातील ४ ते ५ जण शेवटच्या घटका मोजत असल्याची चर्चा असूनही हॉटेल मालक व मॅनेजरला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. तसेच या हॉटेलला घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा करणाऱ्या एजन्सीवरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या प्रकरणामागे राजकीय हस्तक्षेप असल्याची जोरदार चर्चा दौंड शहरात सुरू आहे. दौंड शहर व तालुक्यात अनेक हॉटेल्स व ढाब्यांवर उघडपणे घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असून, पुरवठा विभागाच्या आशीर्वादाने हा गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. ही घटना घडल्यानंतर काही ठिकाणी तात्पुरती कारवाई झाल्याचे दाखवले जात असले, तरी आजही अनेक मोठ्या हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडरचा सर्रास वापर सुरू आहे. काही हॉटेलचालक केवळ बाहेर व्यावसायिक सिलिंडर ठेवून आतमध्ये घरगुती सिलिंडर वापरत असल्याचा देखावा करत आहेत. एवढा मोठा स्फोट होऊनही १५ घरगुती सिलिंडर एकाच ठिकाणी कसे वापरण्यात आले? याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. गॅस पुरवठादार शहरात मोकाट फिरत असून, त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, या दहा भाजलेल्या नागरिकांना न्याय मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून, या संपूर्ण प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र, मोठ्या राजकीय दबावामुळे केवळ थातूरमातूर कारवाई करून दोषींना अभय दिले जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. राजकारण व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गोरगरिबांचा जीव जातो, याला जबाबदार कोण? हा प्रश्न दौंडकर नागरिकांना सतावत आहे.




## प्रेमप्रकरणातून नायजेरियन नागरिकाची हत्या; दोन आरोपी ताब्यात

पुणे । प्रतिनिधी

**काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रेमप्रकरणाच्या कारणावरून झालेल्या वादातून एका नायजेरियन नागरिकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना आज १२ जानेवारी २०२६ रोजी पिसोळी परिसरात घडली.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एनकेनिया पेंट्रिशिया मबिगा (रा. लिमरास हाइट्स सोसायटी, बालाजी पद्मावती नगर, धर्मावत पेट्रोलपंपाजवळ, पिसोळी, पुणे) या नायजेरियन महिलेच्या घरी येमेका क्रिस्टीएन (४०, रा. फुरसुंगी, मूळ नायजेरिया) हे जेवणासाठी गेले होते. यावेळी येमेका क्रिस्टीएन यांचा नायेमेका मादूबुची ओनिया, किन्सली, ओबी व ओजे ओजगवा या नायजेरियन इसमांशी प्रेमप्रकरणाच्या कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, संबंधित आरोपींनी संगनमत करून येमेका क्रिस्टीएन यांना डोक्यावर, हातावर व पायावर जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. जखमी अवस्थेत त्यांना त्यांचे मित्र गिफ्ट सिव्होनस ऊटाह ( ३९, व्हाइस प्रेसिडेंट – नायजेरियन स्टुडंट युनियन, पुणे, रा. उंड्री) यांनी उपचारासाठी रुबी हॉल हॉस्पिटल, वानवडी येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान येमेका क्रिस्टीएन यांचा मृत्यू झाला.

## साखर कारखानदारीवर ‘आर्थिक संक्रांत’

### हर्षवर्धन पाटलांनी केंद्र सरकारकडे केली ‘ही’ मोठी मागणी

इंदापूर । प्रतिनिधी

**चालू गळीत हंगामाच्या सुरुवातीलाच साखरेच्या दरात झालेली घसरण आणि गेल्या तीन वर्षांपासून इथेनॉलच्या किमतीत झालेली स्थिरता यामुळे देशातील साखर कारखानदारी मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केले. साखरेचे दर क्विंटलमागे ३०० रुपयांनी घटल्याने कारखान्यांना शेतकऱ्यांची देयके वेळेवर देणे कठीण होत असून, यावर उपाय म्हणून साखरेचा किमान विक्री दर (चड्झ) ४१ रुपये करावा.**



अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, उसाचा एफआरपी खर्च वाढलेला असताना साखरेची विक्री किंमत मात्र कमी आहे. सध्या साखरेचा सरासरी दर ३६०० रुपये प्रति क्विंटल असून उसाचा उत्पादन खर्च ४ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे. ही तफावत दूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि अन्न मंत्री प्रल्हाद जोशी यांना निवेदने देण्यात आली आहेत. साखरेचा किमान विक्री दर ३१ रुपयांवरून ४१ रुपये करणे व्यवहार्य आहे, कारण यापूर्वी ग्राहकांनी वाढीव दर स्वीकारले आहेत. तसेच इथेनॉलच्या विक्री किमतीतही तातडीने वाढ करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.केंद्र सरकारच्या भेटीसाठी लवकरच महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशातील साखर प्रतिनिधींचे शिष्टमंडळ दिल्लीला जाणार आहे. याशिवाय, अतिरिक्त साखरेचा साठा विचारात घेता ५ लाख मेट्रिक टन साखर निर्यातीस परवानगी द्यावी, अशी मागणीही महासंघाने केली आहे. कारखान्यांवरील व्याजाचे ओझे कमी करण्यासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना १४ दिवसांच्या आत बिले देण्यासाठी केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली आहे.